



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक १६४ * नांदेड * रविवार, दि. २१ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# परभणीत हनुमान मंदिराचा सभा मंडप कोसळला, ६ जणांचा मृत्यू

**परभणी (प्रतिनिधी)–** परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरात सभा मंडप कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १७ जण जखमी झाले आहे. सभा मंडप कोसळल्याने या ढिगाऱ्याखाली एकूण २३ जण दबल्याची माहिती मिळत होती.

मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध हनुमान मंदिरातील सभा मंडप कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. सभामंडप कोसळल्याने या मलब्याखाली ३० ते ४० जण अडकले होते. यातील ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. प्रशासनाला माहिती मिळताच बचावकार्य सुरु करण्यात आले होते. प्रत्येक शनिवारी मोठ्या प्रमाणात या मंदिरात गर्दी होत असते. शनिवारी देखील या मंदिरात मोठी गर्दी झाली होती. अशा वेळी सभामंडपाचे काम सुरू असल्याने सभामंडप कोसळल्याची घटना घडली आहे.



परभणीच्या मानवत तालुक्यातील यशवाडी हे प्रसिद्ध हनुमान देवस्थान आहे. राज्यभरातून भाविक दर्शनासाठी दर शनिवारी येतात. यशवाडी हनुमान मंदिर परिसरात अनेक विकास कामे सुरू आहेत. मंदिरच्या सभा मंडपाचे काम हे राजस्थानी दगड आणून करण्यात आले होते. त्याचे काम सुरूच होते. अनेक ठिकाणी त्याला सपोर्ट लावण्यात आला होता. दुपारी ३ वाजून २ मिनीटांनी अचानक हा सभा मंडप कोसळला. एकूण ३२ जण अडकले गेले होते. यामधील ७ जणांचा मृत्यू झाला आहे. सगळ्यांना बाहेर काढण्यात आले आहे. जखमींवर उपचार सुरु आहेत. अडीच तासानंतर हे बचावकार्य पूर्ण झाले.

प्रत्येक शनिवारी या हनुमान मंदिरात २५ ते ५० हजार भाविक दर्शनासाठी येतात. या ठिकाणच्या सभामंडपाचे काम जवळपास पूर्णत्वास आले होते. पण दगडाचा जॉईंट नीट न झाल्यामुळे हा सभामंडप पडल्याची शक्यता असावी अशी माहिती आमदार राजेश विटेकर यांनी दिली. क्रेनच्या सहाय्याने येथील दगड हटविण्यात आले. घटनेतील दुखापत झालेल्या नागरिकांना रुग्णालयात दाखल आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

यशवाडी हनुमान मंदिर परिसरातील बचावकार्य अडीच तासानंतर पूर्ण झाले. अडकलेल्या सर्व ३२ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. ३२ पैकी ७ जणांचा मृत्यू तर २५ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती जिल्हाधिकारी संजय चव्हाण, उपविभागीय अधिकारी संगीता चव्हाण व तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी दिली. बचावकार्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, अग्निशमन विभाग पाथरी, मानवत सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा आरोग्य अधिकारी, वैद्यकीय पथक महापालिका परभणी, स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने बचावकार्य पूर्ण करण्यात आले.

दरम्यान, प्रशासनाकडून तत्काळ बचावकार्य सुरु करण्यात आले होते. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सर्व यंत्रणा घटनास्थळी पाठवली होती. अनेक ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. जिल्हा प्रशासनाचे अधिकारी, पोलीस घटनास्थळी दाखल झाले होते.

### कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी –मुख्यमंत्री

परभणी जिल्ह्यातील यशवाडी येथे हनुमान मंदिराच्या निर्माणकार्य सुरु असलेल्या छताचा भाग कोसळून झालेल्या दुर्दैवी घटनेत काही भाविकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या घटनेतील जखमींवर उपचार केले जात आहेत. स्थानिक प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी असून मदत आणि बचावकार्य सुद्धा वेगाने सुरु आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

# अनाधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांवर आता फौजदारी गुन्हे; जिल्हाधिकाऱ्यांचा इशारा

## धरणांमध्ये केवळ ३१.४० टक्के उपयुक्त पाणीसाठा

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात यंदा अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने जलाशय, तलाव व इतर पाणीसाठ्यांमधील पाणीपातळी झपाट्याने खालावत असून अनेक ठिकाणी पाण्याचे स्रोत आटण्याच्या स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता कायम राखण्यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. मात्र पाणीपुरवठ्यासाठी राखीव असलेल्या तलाव, बंधारे, जलाशय व इतर स्रोतांमधून मोटार, विद्युत पंप अथवा अन्य साधनांच्या सहाय्याने अनाधिकृतरीत्या पाणी उपसा केल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. त्यामुळे अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला आहे.

जिल्ह्यातील जलसाठ्यांची स्थितीही चिंताजनक बनली आहे. दि. १८ जून २०२६ रोजीच्या अहवालानुसार नांदेड जिल्ह्यातील १०४ लघू व मध्यम प्रकल्पांमध्ये एकूण ८०५.८७ दलघमी साठवण क्षमतेपैकी केवळ २२८.३९ दलघमी म्हणजेच ३१.४० टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे. मागील वर्षी याच दिवशी हा साठा २५१.०१ दलघमी (३४.५१ टक्के) होता. जलसाठ्यात झालेली ही घट आगामी काळातील पाणीटंचाईची तीव्रता दर्शवित असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

जमिनीतील तसेच सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमधून होणाऱ्या अवैध पाणी उपशामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. त्यामुळे अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ तसेच महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ मधील तरतुदींनुसार शासनाच्या अथवा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांमधून विनापरवाना पाणी उपसा करणे बेकायदेशीर आहे. तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ अंतर्गत सार्वजनिक हितास बाधा निर्माण करणाऱ्या कृत्यांवर कारवाईची तरतूद आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले की, पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून ग्रामपंचायत, महसूल, पोलीस, पाटबंधारे व संबंधित विभागांनी अनधिकृत पाणी उपशावर बारकाईने लक्ष ठेवून तात्काळ कारवाई करावी. अनधिकृत पाणी उपसा आढळून आल्यास संबंधित विद्युत पंप जप्त करणे, वीजपुरवठा खंडित करणे तसेच संबंधित व्यक्तींविरुद्ध दंडात्मक आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद करून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी व ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांचे संरक्षण करावे तसेच पिण्याच्या पाण्यास बाधा पोहोचविणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत पाणी उपशाची माहिती संबंधित तहसील कार्यालय, ग्रामपंचायत किंवा जिल्हा प्रशासनास तात्काळ द्यावी, असे आवाहन केले आहे.

# आज 'नीट' री-एग्झाम: पुन्हा गोंधळ! नागपूरच्या विद्यार्थ्याला चक्क अबुधाबीतील सेंटर

**नागपूर (प्रतिनिधी)–** आज दि. २१ जून रोजी देशात 'नीट' ची री-एग्झाम होणार असून पुन्हा या परीक्षेत गोंधळ दिसून आला आहे. नागपूरच्या एका विद्यार्थ्याला चक्क अबुधाबीतील सेंटर दिल्याने विद्यार्थ्याचा गोंधळ उडाला आहे.




एकीकडे सरकार 'नीट' परीक्षा अत्यंत पारदर्शक आणि चोख पद्धतीने पार पाडण्याचे मोठे दावे करत आहे, तर दुसरीकडे नॅशनल टेस्टिंग एजन्सीचा ढिसाळ कारभार थांबण्याचे नाव घेत नाहीये. आज दि. २१ जून रोजी होणाऱ्या नीटच्या फेरपरीक्षेमध्ये एनटीएचा एक मोठा आणि अजब निष्काळजीपणा समोर आला आहे. नागपूरमधील एका विद्यार्थ्याला एनटीएने थेट परदेशातील म्हणजेच संयुक्त अरब अमिरातीच्या 'अबू धाबी' येथील परीक्षा केंद्र दिले आहे. या तांत्रिक चुकीमुळे अवघ्या काही तासांवर परीक्षा आली असताना विद्यार्थी आणि त्याच्या पालकांचा जीव टांगणीला लागला आहे.

नागपूर येथील अब्दुल्लाह नावाच्या विद्यार्थ्याने नीट परीक्षेसाठी अर्ज करताना केंद्राची निवड करण्यासाठी नागपूर आणि वर्धा या स्थानिक शहरांना पहिली पसंती दिली होती. यापूर्वी झालेल्या परीक्षेत त्याला नागपूरमध्येच केंद्र मिळाले होते.

# सुस्तावलेला पाऊस सक्रीय होणार, महाराष्ट्रासह मध्य भारतात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या दोन आठवड्यांपासून देशातील विविध राज्यांमध्ये मान्सूनची प्रगती मंदावली होती, ज्यामुळे पावसाची तूट निर्माण झाली होती. मात्र, आता हवामान विभागाने (एमआयडी) दिलेल्या नवीन अंदाजानुसार, मान्सून पुन्हा एकदा सक्रीय होत असून, ढगांची गर्दी वाढल्याने महाराष्ट्रासह मध्य भारतातील राज्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मध्य भारतात गेल्या काही दिवसांपासून निरभ्र आकाश आणि तीव्र उष्णतेची स्थिती होती. परंतु, आता पावसाला पोषक वातावरण तयार झाले असून, मान्सूनचे ढग पुन्हा जोर धरत आहेत. मान्सूनचे हे पुनरागमन खरिपाच्या हंगामासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही दिवसांत अनेक राज्यांत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मान्सूनचा हा प्रवास केवळ मध्य भारतापुरता मर्यादित नसून, येत्या आठवड्यात दक्षिण भारतात पावसाचे प्रमाण सर्वाधिक राहण्याची शक्यता आहे.

देशाच्या अनेक भागांत पावसाची प्रतीक्षा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही मोठी बातमी आहे. सुरुवातीला जोरदार आगमन झाल्यानंतर रेंगाळलेला मान्सून आता पुन्हा सर्वदूर पसरण्यासाठी सज्ज झाला आहे. वाढती ढगांची गर्दी पाहता, आगामी काही दिवसांत मान्सून उत्तर आणि मध्य भारताच्या दिशेने वेगाने पुढे सरकण्यास अनुकूल वातावरण तयार झाले आहे.

# पवनराजे निंबाळकर हत्येप्रकरणी पद्मसिंह पाटीलसह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता

**मुंबई (प्रतिनिधी)–** धाराशिवमधील खासदार ओमराजे निंबाळकर यांचे वडिल, पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरणाचा निकाल दि. २० जून रोजी सीबीआय कोर्टाकडून जाहीर करण्यात आला. न्यायालयाने मुख्य आरोपी माजी गृहमंत्री पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्वच आरोपींची निर्दोष मुक्तता केली. त्यामुळे, खासदार ओमराजेंना हा मोठा धक्का मानला जात आहे.

निकालानंतर दोन्ही कुटुंबियांनी प्रतिक्रिया दिल्या असून पद्मसिंह पाटील यांचे वकिल ॲड. भूषण महाडिक यांनीही भूमिका मांडली.

हे सर्व प्रकरण तथाकथित आहे, या गुन्ह्यातील सर्व सूत्रधार बाजूला ठेवून राजकीयदृष्ट्या खोटा खटला त्रास देण्यासाठी दाखल केला. याप्रकरणातील माफीचा साक्षीदार पारसमल जैन यांच्या साक्षीने प्रकरण गृहित धरता येत नाही, अशी प्रतिक्रिया पद्मसिंह पाटील यांच्या वकिलांनी दिली. कंळबोली पोलिसांनी याप्रकरणात दीड वर्षे तपास केला, मयताच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरून तपास केला, पद्मसिंह पाटील कॅबिनेट मंत्री असताना त्यांना बदनाम करण्यासाठी हे सर्व केले, असेही आरोपींचे वकील भूषण महाडिक यांनी म्हटले. मारिया यांचाही जबाब नोंदवण्यात आला, त्यांनीही माझा काही संबंध नाही असे म्हटले. त्यामुळे, माफीचा साक्षीदार असलेला 'जैन हा खोटारडा व्यक्ती आहे हे स्पष्ट झालं, असेही वकील भूषण महाडिक यांनी म्हटले. दरम्यान, वकिलांनी फेब्रुवारी २००९ पासूनच्या खटल्यातील घडामोडींवरही भाष्य केलं.

### सीबीआयने उच्च न्यायालयात दाद मागावी –खा. ओमराजे निंबाळकर

गेल्या २० वर्षांपासून आमचं कुटुंब न्यायासाठी संघर्ष करत आहे, ज्या लोकांनी हे नीच कृत्य केलंय, त्यांना शिक्षा व्हावी ही मागणी करण काही गैर आहे का? सीबीआयने उच्च न्यायालयात याबाबत दाद मागावी, अशी अपेक्षा खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्यक्त केली आहे.

# भाजप प्रवेशाच्या चर्चांना जवळगावकरांचा ब्रेक; मी काँग्रेसमध्येच, अफवांवर विश्वास ठेवू नका

## भाजप प्रवेशाच्या चर्चांवर स्पष्टोक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव- हिमायतनगर मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय चर्चांना काँग्रेसचे नेते तथा माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. भाजप प्रवेशाच्या चर्चांनी वेग घेत असतानाच जवळगाव येथे आयोजित काँग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीत त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मी काँग्रेस पक्षामुळेच आज या स्थानावर पोहोचलो आहे. मी कोणत्याही पक्षात जाणार नाही, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये, अशी भूमिका माजी आ. माधवराव पाटील जवटकावर यांनी मांडली.



जवळगाव येथे झालेल्या बैठकीत तालुक्यातील सरपंच, उपसरपंच, सेवा सहकारी संस्थांचे पदाधिकारी, काँग्रेसचे कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांनी विविध राजकीय घडामोडींवर आपली मते व्यक्त केली. काहींनी जवळगावकर यांनी काँग्रेसमध्येच राहून नेतृत्व करावे, अशी मागणी केली, तर काहींनी बदलत्या राजकीय परिस्थितीत विकासासाठी नवीन पर्यायांचा विचार करण्याचा सल्ला दिला.

मात्र या सर्व चर्चांवर भाष्य करताना जवळगावकर म्हणाले, माझी ताकद पक्षांत्तरात नाही, तर जनतेच्या विश्वासात आहे. मतदारसंघातील जनतेने आणि कार्यकर्त्यांनी मला आजपर्यंत साथ दिली. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना त्यांची भावना महत्त्वाची राहील. कार्यकर्त्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.

विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून जवळगावकर भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांमुळे राजकीय वातावरण तापले होते. त्यातच विविध स्तरांवर सुरू असलेल्या बैठका आणि संपर्क मोहिमांमुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले होते. मात्र जवळगाव येथील बैठकीत त्यांनी थेट भूमिका स्पष्ट केल्याने कार्यकर्त्यांमधील संभ्रम काही प्रमाणात दूर झाल्याचे दिसून आले.

### कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच निर्णय घेणार

काँग्रेस पक्षाने आजपर्यंत दिलेली प्रत्येक जबाबदारी मी प्रामाणिकपणे आणि एकनिष्ठपणे पार पाडली आहे. मात्र सध्याच्या राजकीय परिस्थितीत मतदारसंघाचा विकास, जनतेची कामे आणि कार्यकर्त्यांचे भविष्य लक्षात घेऊन पुढील दिशा ठरविणे आवश्यक झाले आहे. कोणताही निर्णय एकट्याने घेणार नाही, तर दोन्ही तालुक्यांतील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि जनतेला विश्वासात घेऊनच पुढील राजकीय भूमिका निश्चित करणार आहे. कार्यकर्त्यांच्या भावना आणि मतांचा आदर राखतच भाजप पक्षप्रवेशाबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही माजी आ. जवळगावर यांनी स्पष्ट केले आहे.




# पोलीस महिलेची छेड काढणे आले अंगलट; हातात निलंबनाचा आदेश तर पीआय नियंत्रण कक्षात?

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील जिल्हा पोलीस दलाच्या परिवहन विभागात (एमटी) एका सहकारी महिलेच्या तक्रारीवरून पोलीस कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले असून पोलीस निरीक्षकांना नियंत्रण कक्षाचा रस्ता दाखवला आहे. या कारवाईमुळे पुन्हा एकदा पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

परिवहन विभागात (एमटी) चालक या पदावर काम करणाऱ्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्यासोबत गैरवर्तन करणारा हजेरी मेजर, सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय जाधव याच्या चांगलेच अंगलट आले. सदर महिलेच्या छेडछाडीबद्दल तिने या प्रकरणाची माहिती आपल्या विभागाचे प्रमुख असलेले पोलीस निरीक्षक यांना दिली. परंतु त्यांनीही तिला सहकार्य केले नसल्याने अखेर जिल्हा पोलीस दलाचे कुटुंबप्रमुख असलेले पोलीस अधीक्षक यांच्याकडे महिलेने न्याय मागितला. घडलेला प्रकार तिने आपल्या तक्रार अर्जात सविस्तर मांडला. या गंभीर प्रकरणाची चौकशी केल्यानंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी संबंधित पोलीस कर्मचारी संजय जाधव याच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. तर पोलीस निरीक्षक यांचा वरिष्ठांकडे कसुरी अहवाल पाठवून तुर्तास त्यांना नियंत्रण कक्षात संलग्न करण्यात आल्याचे समजते. दोन दिवसांपूर्वी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अवैध धंदेवाल्यांशी हात मिळवणी करणारे परभणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक यांना नांदेड नियंत्रण कक्षात संलग्न केले होते. ही घटना ताजी असतानाच पुन्हा एकदा नांदेड पोलीस दलात या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई झाल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी पोलीस निरीक्षक यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, सदर महिला कर्मचारी आपल्या कर्तव्यात सतत कसूर करत होती. ती इतवारा दामिनी पथकाच्या गाडीवर असताना वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका डिव्हायडरवर आपली गाडी चालवून सुद्धा चूक मान्य न करण्याचा प्रयत्न केला होता. यानंतर गणपती विसर्जन बंदोबस्त कामी ती गैरहजर राहिली. एक नव्हे तर दोन कसुरी अहवाल मी स्वतः वरिष्ठांकडे पाठविल्यानंतर सदर महिलेचा राग माझ्यावर होता. पण माझा या प्रकरणात काहीही दोष नसून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची चौकशी करतील आणि मला न्याय देतील असा विश्वास संबंधित पोलीस निरीक्षकाने बोलून दाखवला.

# प्रियकरासोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी; गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रियकरासोबत काढलेले फोटो सोशल मीडियावर प्रसारित करून बदनामी करतो, असे म्हणून पीडित युवतीकडून तब्बल २ लाख १० हजार रुपये खंडणी घेतली. मानसिक त्रास देऊन खंडणी उकळणाऱ्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार दि. २८ फेब्रुवारी २०२२ पासून ते ११ जून २०२६ पर्यंत सुरू होता.

नांदेड शहराच्या रामानंदनगर भागात राहणाऱ्या एका युवतीचे प्रेम प्रकरण तिच्या एका मित्रासोबत होते, परंतु या दोघांचे प्रेम प्रकरणाचे फोटो आरोपी सचिन गौतम कोकरे रा. छत्रपती चौक नांदेड याने मिळविले. ते फोटो आपल्याकडे हस्तगत केल्यानंतर सोशल मीडियावर अपलोड करून व्हायरल करतो. यामुळे तुझी समाजात बदनामी होईल, एवढेच नाही तर तुझा विवाह होऊ देणार नाही असे म्हणून तिला मानसिक त्रास देणे सुरू केले. दरम्यानच्या काळात २ लाख १० हजार रुपये पीडित युवतीकडून घेऊन तिची फसवणूक केली. पीडित महिलेच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आरोपी सचिन कोकरेविरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक राजेश पुरी करत आहेत.



# आरोग्यासाठी योगा, पारंपरिक खेळ व वृक्ष लागवड काळाची गरज



संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव ठेवला होता. त्यानंतर ११ डिसेंबर २०१४ ला संयुक्त राष्ट्र महासभेने दरवर्षी २१ जूनला जागतिक योग दिन म्हणून मान्यता देण्याचे मान्य केले आणि २१ जून २०१५ ला पहिले आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरे केल्या गेले. योगाला भारत सरकारने जागतिक दर्जा देवून भारताची मान जगात उंचावली आहे. योग व्यायामाचे आणि आरोग्याचे प्रभावशाली माध्यम असून शरीरांच्या अवयवांचाच नव्हे तर मन, मेंदू आणि आत्म्याचे संतुलन ठेवण्याचे काम योगाच्या माध्यमातून होत असते.

योग ही भारतातील ५ हजार वर्षे जुनी परंपरा असून शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक साधना आहे. त्यामुळे ऋषी-मुनी, तपस्वी यांनी योग संस्कृती अवलंबली होती. आरोग्य रक्षणासाठी योगा व व्यायाम अती आवश्यक आहे. अत्याधुनिक युगात व बदलत्या काळानुसार मानवजातीला मनमोकळेपणाने बागडण्याकरिता जागा किंवा मैदान अपुरे पडताना दिसतात. कारण आधुनिक युगात आपण कुठेही नजर फिरवली तर आपल्याला गगनचुंबी इमारती, कारखाने, उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. अशा परिस्थितीत लहान-मोठी, आबाल-वृध्द खुल्या हवेत बागडू शकत नाही. परंतु शरीराला व्यायाम सुध्दा आवश्यक असतो. अशा वेळेला आपण योगा, व्यायाम शाळा व जिमचा सहारा घेवून शरीराला सुदृढ ठेवण्याचा प्रयत्न सर्व करतात.

पूर्वी अनेक मातीतील खेळ खेळले जायचे व जखमा सुध्दा व्हायच्या, परंतु या जखमा त्याच मातीने दुरूस्त सुध्दा व्हायच्या. अशा परिस्थितीत शरीराच्या प्रत्येक अवयवांचा व्यायाम होत असे. परंतु कालांतराने मोबाईलच्या छंदामुळे संपूर्ण जुने छोटे-मोठे खेळ लुप्त होताना दिसतात. परंतु शरीर सुदृढ व निरोगी ठेवण्यासाठी व्यायाम अती आवश्यक आहे. योगाच्या सहाय्याने आपण घरबसल्या व्यायाम करू शकतो. आज जगातील १९० देशांनी योगाभ्यास अंगीकारला आहे. यात अनेक मुस्लीम राष्ट्र सुध्दा आहेत. हा भारताचा मोठा मान आहे. कारण समाजातील प्रत्येक कुटुंबातील लहान-मोठे योगाभ्यास करून आपले आरोग्य सुदृढ ठेवू शकतो.

आजच्या परिस्थितीत मूल पुढील भविष्याच्या वाटचालीकरिता अभ्यातमग्न असतात आणि मनोरंजनाचे साधन म्हणून भारतासह जगातील ८० टक्के जनता मोबाईलच्या व कांम्पुटरच्या अधीन झाल्याचे दिसून येते. यामुळे डोक्यावर तान येणे, डोळे दुखणे, मेंदुवर परिनाम होणे इत्यादी अनेक विकार मोबाईलमुळे व कम्प्युटरमुळे होतांना आपण पहातो. परंतु यावर निराकरण करण्याचे काम योगा करणे, व्यायाम करणे, जिमनॅस्टिक किंवा जिमच्या माध्यमातून शरीरयष्टी सुदृढ ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. आपण योगाभ्यासाचा विचार केला तर भारतात अनेक युगानुयुगांपासून योगाभ्यास ऋषी-मुनी, साधू-संत, महायोगी, तपस्वी इत्यादी अनेक महान विभूती झाडाखाली योगसाधना करायची. परंतु आज वाढते प्रदूषण, धावपळीचे जीवन, ग्लोबल वार्मिंग, वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण व बदलते हवामान यामुळे खुला व्यायाम करण्यास अनेक अडचणी निर्माण होतात. परंतु योगाभ्यास चार भिंतींच्या आत सुध्दा करता येतो. त्यामुळेच जगातील अनेक देशांनी योगाभ्यासाला जास्त महत्त्व दिले आहे.

भारताने योगाला जागतिक पातळीवर नेऊन भारत योगगुरू बनला आहे. त्याचप्रमाणे भारताने योगाभ्यास जागतिक पातळीवर नेऊन जगाला व्यायामाची व शरीर सुदृढ ठेवण्याची मोठी दिशा देण्याचे काम केले आहे. भारत जागतिक पातळीवर लोकांचे जीवन उंचावण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहिला आहे. योग दिनाच्या निमित्ताने सर्वांनीच योगाभ्यास अंगीकारला पाहिजे. योग दिनाच्या निमित्ताने प्रदूषणावर मात करण्यासाठी प्रत्येकांनी घर तिथे झाड ही मोहीम राबवून या दिवसाला आगळेवेगळे ऐतिहासिक महत्व देऊन वृक्षारोपण केले पाहिजे. कारण आरोग्यासाठी वृक्ष ही सर्वांसाठी संजीवनी आहे. आपल्या राज्यात ३६ जिल्हे, प्रत्येकात साधारण ५ तालुके, म्हणजे १८० तालुके व राज्यात आमदार २८८ (वि.परिषदचे वेगळेच) वृक्षारोपण हा मुद्दा आमदार-खासदार, कलेक्टर, बीडीओ, असे अनेक जबाबदार अधिकारी मिळून प्रशासनाने व सामाजिक संघटनांनी योग दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करायला हवी. जागतिक योग दिवस महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात साजरा होणार आहे.


आजच्या परिस्थितीत ज्याप्रमाणे मनुष्याच्या आरोग्यासाठी योगा आवश्यक आहे. त्याच प्रमाणे ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे. याकडे मुख्यत्वेकरून प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. योग दिनाच्या निमित्ताने प्रशासने, शाळा, महाविद्यालये, एसटी स्टँड, संपूर्ण प्रशासकीय ठिकाणे, कारागृह या संपूर्ण ठिकाणी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व्हायला हवे. यामुळे जागतिक विक्रम होईलच सोबत आरोग्याची जोपासना सुध्दा होईल. अशाप्रकारे योगासोबत आरोग्यासाठी वृक्षारोपण चळवळ पुढे नेली पाहिजे. कारण ह्या संपूर्ण बाबी आरोग्याशी निगडित आहे.

योगाभ्यासमुळे शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक, आरोग्य आणि शांतीसाठी याचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळतो. त्यामुळेच जगातील १९० देशांनी योगाला स्वीकारले आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात वाढते नवीन-नवीन आजार चिंतेचा विषय आहे. त्यामुळे योग साधना करून व्यायाम करणे तेवढेच आवश्यक आहे. कारण आरोग्य हिच संपत्ती हा मूलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. योग दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारने व राज्य सरकारने राष्ट्रीय खेळांना महत्व देवून व्यायाम करण्याची प्रवृत्ती जागृत करण्याची गरज आहे.

जगातील प्राचीन संस्कृती भारतात आताही आहे. त्यामुळे आपल्याला योग परंपरेच्या माध्यमातून ती पहायला मिळते. त्यामुळे आज योगाभ्यास जगासाठी अनमोल रत्न व संजीवनी सिध्द होत आहे. याचा भारतीयांना अभिमान आहे. योग दिनाच्या निमित्ताने ऑक्सिजनची मात्रा वाढविण्यासाठी आपण सर्वांनी वृक्षारोपणाचा संकल्प करावयास पाहिजे. कारण पूर्वी ऋषी मुनी, तपस्वी, महाग्यानी झाडाखालीच योगाभ्यास करायचे, त्याचप्रमाणे पूर्वी शिक्षण सुध्दा झाडाखालीच व्हायचे. यावरून स्पष्ट होते की, वृक्षाशिवाय पुढचे पाऊल अवघड असते. त्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने व योग दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह भारतात जास्तीत जास्त वृक्षारोपण कसे करता येईल याकडे सरकारने, राजकीय पुढाऱ्यांनी व सामाजिक संघटनांनी लक्ष देण्याची गरज आहे. योगा करूया; व्यायाम करूया; वृक्ष लावूया; वृक्ष जगवूया आणि निसर्गाचा समतोल राखण्याचा संकल्प करूया.

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो. ९९२१६९०७७९

# वडील : कुटुंबाचा आधारस्तंभ आणि संस्कारांचे विद्यापीठ



जून महिन्यातील तिसरा रविवार हा दिवस संपूर्ण जगभर 'जागतिक पितृदिन' म्हणून साजरा केला जातो. २१ जून २०२६ रोजी हा दिवस पुन्हा एकदा पितृत्वाच्या गौरवासाठी, वडिलांच्या त्यागासाठी आणि त्यांच्या निःशब्द प्रेमासाठी समर्पित होत आहे. हा दिवस केवळ औपचारिक उत्सव नाही, तर मानवी जीवनातील त्या व्यक्तीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रसंग आहे, जी आपल्या संपूर्ण कुटुंबाचा आधारस्तंभ असते. वडील हे केवळ घर चालवणारे व्यक्तिमत्त्व नसून, ते कुटुंबाच्या भवितव्याचा पाया घालणारे, संस्कारांचे बीज पेरणारे आणि आयुष्यभर न थांबता झटणारे एक अदृश्य शक्तीस्रोत असतात. त्यांच्या भूमिकेला अनेकदा शब्द मिळत नाहीत, परंतु त्यांच्या अस्तित्वाशिवाय कुटुंबाची कल्पनाही अपूर्ण ठरते.

वडिलांचे व्यक्तिमत्त्व हे अनेक स्तरांनी बनलेले असते. बाहेरून ते कठोर, शिस्तप्रिय आणि गंभीर वाटू शकतात, परंतु आतून ते अत्यंत संवेदनशील, काळजीवाहू आणि प्रेमळ असतात. त्यांच्या भावना सहज व्यक्त होत नाहीत, कारण त्यांनी स्वतःला कुटुंबासाठी एका जबाबदारीच्या चौकटीत बांधून घेतलेले असते. मुलांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या इच्छा, आकांक्षा आणि अनेकदा स्वप्नांचा त्याग करणारा पिता हा खऱ्या अर्थाने त्यागाचा मूर्तिमंत आदर्श आहे. तो स्वतःच्या आनंदापेक्षा कुटुंबाच्या आनंदाला प्राधान्य देतो आणि हे करताना तो कधीही तक्रार करत नाही.

भारतीय संस्कृतीत आई-वडिलांना देवतुल्य स्थान दिले गेले आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव ही संकल्पना केवळ धार्मिक उपदेश नसून जीवनाचा मूलभूत आधार आहे. आई प्रेम देते, तर वडील दिशा देतात. आई भावनिक आधार देते, तर वडील व्यवहारिक जीवनाची समज देतात. आई जवळ घेते, तर वडील पुढे जाण्यासाठी धैर्य देतात. दोघांच्या भूमिका वेगळ्या असल्या तरी त्या परस्परपूरक आहेत. परंतु वडिलांची भूमिका अधिक शांत, स्थिर आणि जबाबदारीने भरलेली असते.

लहानपणी प्रत्येक मुलाच्या आयुष्यात वडील हा पहिला नायक असतो. मुलाला वाटते की त्याचे वडील सर्व काही करू शकतात. ही भावना केवळ बालसुलभ कल्पना नसून त्याच्या आत्मविश्वासाची पायाभरणी असते. वडिलांचे वागणे, बोलणे, निर्णय घेण्याची पद्धत आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हे सर्व मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर खोल परिणाम करतात. त्यामुळे वडील हे केवळ पालक नसून व्यक्तिमत्त्व घडवणारे शिल्पकार असतात.

पित्याचे प्रेम हे शब्दांपेक्षा कृतीत अधिक दिसते. तो मी तुझ्यावर प्रेम करतो असे फारसे म्हणत नाही, पण ते प्रेम प्रत्येक महिन्याच्या फीमध्ये, घरातील गरजांमध्ये, मुलांच्या पुस्तकांमध्ये आणि त्यांच्या सुरक्षित भविष्यात दिसते. तो स्वतः जुने कपडे वापरतो, पण मुलांना नवीन कपडे मिळावेत यासाठी झटतो. तो स्वतः थकतो, पण मुलांना थकू देत नाही. त्याचे प्रेम न दिसणारे पण सर्वत्र जाणवणारे असते.

पिता हा कुटुंबाचा आधारस्तंभ असतो. घरातील आर्थिक स्थिरता, सामाजिक प्रतिष्ठा आणि भविष्यातील सुरक्षितता याची जबाबदारी तो सतत सांभाळतो. अनेकदा तो स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो, कारण त्याच्या मनात कुटुंबाची चिंता अधिक असते. तो रात्रंदिवस मेहनत करतो, परंतु त्याचा थकवा कुटुंबापर्यंत पोहोचू देत नाही. ही त्याची निःशब्द सेवा त्याला कुटुंबात सर्वात महत्त्वाचे स्थान देते.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून वडिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. वडिलांचा सक्रिय सहभाग मुलांच्या मानसिक विकासात स्थिरता निर्माण करतो. ज्या मुलांना वडिलांचा आधार मिळतो, ती मुले अधिक आत्मविश्वासपूर्ण, जबाबदार आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम बनतात. वडिलांचा आधार मुलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करतो, जी त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करते. विशेषतः मुलींसाठी वडिलांचा विश्वास त्यांच्या आत्मसन्मानाचा पाया ठरतो.

ग्रामीण भारतातील वडिलांचे जीवन हे संघर्षाचे जिवंत चित्र आहे. शेतकरी वडील निसर्गाच्या अनिश्चिततेशी झुंज देतात. पाऊस, दुष्काळ, बाजारभाव आणि कर्ज यांच्याशी सामना करत ते आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी पैसे उभे करतात. अनेकदा स्वतः उपाशी राहून मुलांच्या भविष्याचा विचार करतात. त्यांच्या या त्यागामुळेच ग्रामीण भागातील अनेक मुले आज डॉक्टर, अभियंते, शिक्षक आणि अधिकारी बनली आहेत. शहरी भागातील वडिलांचे संघर्ष वेगळे असतात. वाढती महागाई, स्पर्धा, नोकरीतील असुरक्षितता आणि सामाजिक अपेक्षा यामुळे त्यांच्यावर मोठा मानसिक ताण असतो. घराचे हप्ते, मुलांचे शिक्षण, आरोग्यखर्च आणि भविष्याची बचत यांचा समतोल राखताना ते स्वतःच्या इच्छांकडे दुर्लक्ष करतात. तरीही ते सतत पुढे चालत राहतात, कारण त्यांना कुटुंबासाठी स्थैर्य निर्माण करायचे असते.

आजच्या आधुनिक काळात पित्याची भूमिका बदलत आहे. पूर्वी तो केवळ कमावणारा मानला जात होता, परंतु आता तो मुलांच्या संगोपनात सक्रिय सहभागी झाला आहे. मुलांशी संवाद साधणे, त्यांच्या अभ्यासात मदत करणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांच्यासोबत वेळ घालवणे यामध्ये वडील आता अधिक सहभागी होत आहेत. हा बदल कुटुंबव्यवस्थेला अधिक भावनिक आणि समताधिष्ठित बनवत आहे.

वडिलांचे जीवन म्हणजे त्यागाची अखंड कथा आहे. स्वतःच्या स्वप्नांना बाजूला ठेवून मुलांच्या स्वप्नांना पंख देणारा पिता हा निःस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च आदर्श आहे. तो स्वतःचे आराम सोडतो, पण मुलांच्या सोयीसाठी झटतो. तो स्वतःच्या गरजा कमी करतो, पण मुलांच्या गरजा पूर्ण करतो. त्याचा प्रत्येक श्वास कुटुंबासाठी असतो.

भारतीय साहित्य आणि संस्कृतीत पित्याचे विविध रूपे दिसतात. कधी तो कठोर शिक्षक असतो, कधी प्रेमळ मित्र असतो, कधी संघर्ष करणारा कामगार असतो, तर कधी मुलांच्या भविष्यासाठी स्वतःचे जीवन समर्पित करणारा त्यागी पालक असतो. या सर्व रूपांमधून वडिलांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते.

कोविड-१९ महामारीच्या काळात वडिलांच्या भूमिकेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. आर्थिक संकट, नोकरी गमावणे आणि आरोग्याच्या भीतीमध्येही त्यांनी कुटुंबाला आधार दिला. अनेकांनी स्वतःच्या गरजा कमी करून कुटुंबाचे रक्षण केले. या काळाने पित्याच्या जबाबदारीची खरी ओळख समाजासमोर आणली. डिजिटल युगात संवाद कमी होत असताना वडिलांनी मुलांशी संवाद वाढवणे आवश्यक झाले आहे. संवाद हा नात्यांचा पाया आहे. मनमोकळा संवाद नातेसंबंध अधिक मजबूत करतो आणि गैरसमज दूर करतो. वडील हे केवळ कुटुंबप्रमुख नाहीत, तर ते संस्कारांचे विद्यापीठ आहेत. ते मुलांना प्रामाणिकपणा, शिस्त, कष्ट आणि जबाबदारी शिकवतात. त्यांच्या सहवासातून मुलं समाजासाठी चांगले नागरिक बनतात.

वृद्ध वडिलांची काळजी घेणे ही प्रत्येक मुलाची जबाबदारी आहे. त्यांनी आयुष्यभर कुटुंबासाठी झटले असल्यामुळे उतारवयात त्यांना प्रेम, आधार आणि सन्मान मिळणे आवश्यक आहे. त्यांच्यासोबत वेळ घालवणे ही सर्वात मोठी सेवा आहे.

पितृदिन हा भेटवस्तूंचा नाही, तर कृतज्ञतेचा दिवस आहे. वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांना प्रेम देणे हेच या दिवसाचे खरे महत्त्व आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पिता हा समाज घडवणारा शिल्पकार आहे. तो मुलांमध्ये मूल्ये रुजवतो आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देतो. पित्याचे प्रेम हे आकाशासारखे विशाल, समुद्रासारखे खोल आणि वटवृक्षासारखे सावली देणारे असते. तो स्वतः झिजतो, पण कुटुंबाला उभे करतो. अशा या निःशब्द योद्ध्याला म्हणजेच वडिलांना आजच्या या जागतिक पितृदिनानिमित्त कोटी कोटी वंदन.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# भारताने जगाला दिलेली देणगी - योग



रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी नववा आंतरराष्ट्रीय योग दिन संपूर्ण जगात साजरा होत आहे. नागरिकांनी योग, प्राणायाम, आसने करून आपले आरोग्य ठणठणीत ठेवण्याचा संदेश या दिनानिमित्ताने दिला जातो. त्यामुळेच हा लेखन प्रपंच.

योग ही भारताने जगाला दिलेली अनमोल देणगी आहे. युनायटेड नॅशनल जनरल असेंब्लीच्या ६९ व्या सत्रात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याचा प्रस्ताव दिला. संयुक्त राष्ट्राच्या १९३ देशांपैकी १७५ देशाचे सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठिंबा दिला आणि २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. जगभरात दरवर्षी २१ जून हा योग दिन म्हणून अतिशय आनंदाने साजरा केला जातो.

२०१५ मध्ये दिल्ली येथील राजपथ येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन केले. तेव्हा ८४ देशाचे नागरिक उपस्थित होते. त्यावेळी तरुणांना योग करण्याचं मंत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. त्यावेळी त्यात दिव्यांगांचाही समावेश होता. आरोग्यासाठी योगाचा मंत्र दिला. यंदाचा आंतरराष्ट्रीय योग दिन नववा आहे. आपण तो साजरा करत आहोत. हा दिन संपूर्ण जगात शाळा, महाविद्यालयात वेगवेगळ्या संस्थेत प्रतिष्ठानाद्वारे साजरा करत आहोत.

सर्व सजीव सृष्टी ही एकमेकांशी जोडली गेली आहे, त्याचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे योगा होय. भारतात योगा प्राचीन काळापासूनच आहे. योगामध्ये विविध योग सूत्राचा वापर केला जातो. नियम, प्रत्याहार ज्ञान, आसन, भक्ती, ध्यान अशा बाबी त्यामध्ये समाविष्ट केल्या जातात. मानवाला आपल्या जीवनात आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक स्तरावर योगांनी विकास घडवून आणता येतो. संपूर्ण जगात योगाचा प्रचार झाल्यानंतर भारत आणि जग यांची जीवनपद्धती जवळजवळ सकारात्मक बनते. ती शांततेसाठी आपणाला उपयोगी पडते. योग हा जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये संतुलन ठेवण्याव्यतिरिक्त आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टिकोन प्रदान करतो. जीवन सुखी, समृद्ध व आनंदी बनविण्यासाठी योग महत्त्वाची भूमिका बजावतो. योग चिकित्सा, प्रणायाम, योगासन, सूर्यनमस्कार अशा सर्व बाबींची माहिती योगामध्ये होते. २०१५ - सुसंवाद आणि शांततेसाठी योग, २०१६ -शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग, २०१७-मध्ये आरोग्यासाठी योग, त्यानंतर २०१८- शांततेसाठी योग, २०१९- हृदयासाठी योग, २०२० - कौटुंबिक योग, २०२१- कल्याणकारी योग, २०२२- मानवतेसाठी योग आणि यावर्षी २०२३ वसुधैव कुटुंबकम योग साजरा केले जात आहेत.

भारतात पतंजली मुनीच्या काळापासून योग चालू आहे. त्यानंतर स्वामी विवेकानंदांनी जगभर योगाचा प्रचार व प्रसार केला. त्यानंतर योग गुरु रामदेव बाबा तसेच श्री रविशंकर यांनी सुद्धा योगाचा प्रचार व प्रसार केलेला आहे. आपणही करत आहोत. अशा पद्धतीने योग केलेले आहेत. सर्वांना उत्तम आरोग्य हवे तर योग करण्याशिवाय पर्याय नाही हे आपणास आता समजत आहे. योग का करावा? आपण जे अन्न खातो त्याचे पचन व्हावे. हात, पाय, पोट, मान, पाठ याचे स्नायू बळकट व्हावेत तसेच हृदयविकारापासून व इतर रोगापासून मुक्ती मिळावी यासाठी दररोज योग करणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी न चुकता योग करावा. योगाने शरीर निरोगी व बळकट बनते. तसेच उत्तम मानसिक आरोग्य लाभते. वजन नियंत्रणात राहते. कोणत्याही गोष्टीचा संयम आपोआप येतो. अनेक रोगांना लढण्याची क्षमता शरीरात योगामुळे निर्माण होते. तसेच आज उत्तर गोलार्धात भौगोलिकदृष्ट्या २१ जून हा सर्वात मोठा दिवस म्हणून ओळखला जातो. २१ जूनपासून सूर्य आपली स्थिती बदलतो म्हणजेच उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते हा एक नैसर्गिक बदल आहे. तेव्हापासून उष्णता कमी होते व वातावरणात फरक जाणवतो. २१ जूनला योग दिन तसेच सर्वात मोठा दिन असा योगायोग आहे. योगाच्या प्रचंड लोकप्रियतेपुढे जगभरातील विविध भागात योग केंद्रे आणि स्टुडिओची स्थापना झाली आहे. सर्वांनीच दररोज योगा करून आपले जीवन आरोग्यदायी ठेवावे.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष-विठू माऊली प्रतिष्ठान
गोकुळवाडी, ता. मुखेड,
जि. नांदेड

# आंतरराष्ट्रीय योग दिन

आज २१ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्यात यावा असा प्रस्ताव मांडला. २१ जून हा दिवस जगातील अनेक देशांमध्ये सर्वात मोठा दिवस आहे. पृथ्वीला सूर्याभोवती फिरण्यासाठी लागणाऱ्या वेगामुळे २१ जून हा दिवस इतर दिवसांपेक्षा मोठा असतो.

२१ जून रोजी उत्तरायण संपून दक्षिणायन सुरू होते. या दिवशी दिवस मोठा तर रात्र लहान असते. २१ जून रोजी सूर्योदय लवकर होतो आणि सायंकाळी जास्त वेळेपर्यंत उजेड असतो. त्यामुळे या दिवसाला विशेष महत्व प्राप्त होते म्हणून हाच दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडला. पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्र संघाच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दिला. सुरक्षा आयोगाचे कायमस्वरूपी सदस्य असलेले अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, चीन, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. याप्रस्तावावर विस्तृत चर्चा झाल्यानंतर डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली.

प्राचीन काळापासून भारतातल्या साधुसंत, ऋषीमुनींनी योगाचे महत्व, त्याचे फायदे आणि त्याची गरज पटवून दिली आहे. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो; शिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. भारतातील योगाची संस्कृती जागतिक पातळीवर स्वीकारली गेली आहे. जगभरातील देशांनी योग केवळ स्वीकारला नाही, तर त्याचा प्रचार आणि प्रसारही केला आहे.

योग कसा करावा, कोणती योगासने मनाला आणि शरीराला सक्षम ठेवू शकतात यावर अभ्यासकांनी मते मांडली आहेत त्याप्रमाणे दररोज योग साधना करणे गरजेचे आहे. आज योग दिनानिमित्त एक दिवस योग करून त्याचे फोटो सोशल मीडियावर टाकून या दिनाचा इव्हेंट न करता सर्वांनी योगाचा अंगीकार करून नियमित सराव करावा. जगाने योगाला राजमान्यता दिली आहे आपणही नियमित सराव ठेवून योगसाधना केली तरच आजच्या योग दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

## प्रस्तराचे अस्तर


त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
संचिताचे प्रस्तर उकळत
मलाच अस्तर देत होती
चालताना माझीच वाट
वळणावर ती भेटत होती
रुंदनगुज आव्हानाचे
मलाच मी हरवत होती
एकाच वेळी सगळ्या
आघाड्या सांभाळत होती
कर्तव्याची श्रृंखला ती
नवनीत ओवीत होती
ती भेटली पाषाणावर
हातोड्याने प्रहार करताना
छिनून उखळं जाती बत्ते
महादेवांच्या पिंडी डोई घेताना
ती भेटली विकताना
सुई-पोत मनेरी पेटी
हाका देता लेकरांच्या मायांना
असते बांधून बाळ ओटी
अंगावर संसाराचा भार पेलत
जगण्यास बळ शोधीत होती
हजारदा मन मारीत मारीत
दुनिया तिची जगवत होती
त्या अनवट वाटेवरती
ती मजला भेटत होती
प्रस्तराचे अस्तर लेत
मी मलाच गवसत होती.

**-अनिता दाने**
नांदेड

# चंदेरी

## अभिनेता नवनीत रंगाची मुलाखत

# संघर्षच हीच माझी मोठी संपत्ती !; संयम-चिकाटीने शिकवलं महत्त्व



**'बंदर' चित्रपटात बॉबी देओलसोबत दिसणाऱ्या अभिनेता नवनीत रंगाने बॉबीसोबत स्क्रीन शेअर करण्याच्या अनुभवासह आणि चित्रपटातील त्याच्या भूमिकेबद्दल सांगितले. त्याने केवळ बॉबी देओलसोबतच नाही, तर इंडस्ट्रीतील ज्येष्ठ अभिनेते अजय देवगण यांच्यासोबतही काम केले आहे. 'रेड २' मध्ये त्याने एका आयकर अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती, तर आता तो 'बंदर'मध्ये एका गँगस्टरची भूमिका साकारत आहे. चला जाणून घेऊया की, हा अभिनेता त्याच्या 'बंदर' या चित्रपटाबद्दल काय म्हणतो...**

**प्रश्न : चित्रपटातील तुमचा लूक आणि पडद्यावरील वावर सुरुवातीपासूनच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतो. लांब केस, वाढलेली दाढी आणि एक गूढ व्यक्तिमत्त्व, या सर्वांमुळे हे पात्र खूपच वेगळे ठरते. हा लूक आणि हे पात्र साकारण्याची प्रक्रिया कशी होती?**

**नवनीत :** या पात्रासाठी लूक खूप महत्त्वाचा होता. अनुराग सरांना वाटत होते की, या व्यक्तीने पहिल्याच नजरेत प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण करावी. त्यामुळे, या पात्रासाठी एक वेगळे आणि अविस्मरणीय व्यक्तिमत्त्व तयार करण्याकरिता मी माझे केस आणि दाढी वाढवण्यासाठी बराच वेळ घालवला, पण माझ्यासाठी केवळ बाह्य रूपच महत्त्वाचे नव्हते. ही व्यक्ती कसा विचार करते, कशी चालते, लोकांकडे कसे पाहते आणि आपले अस्तित्व कसे जाणवून देते, हे समजून घेण्याचा मी प्रयत्न करत होतो. मी त्याची देहबोली आणि वागणूक खूप साधी ठेवली, कारण अनेकदा सर्वात धोकादायक किंवा गूढ व्यक्ती त्या असतात ज्या पूर्णपणे सामान्य दिसतात. मला आनंद आहे की प्रेक्षकांना केवळ पात्राचे चित्रणच आवडले नाही, तर त्यांनी तिचा लूक आणि पडद्यावरील वावर देखील लक्षात घेतला. एक अभिनेता म्हणून, तुमच्या पात्राचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व लोकांच्या मनात कोरले जाण्यापेक्षा मोठे समाधान दुसरे नाही.

**प्रश्न : 'बंदर'मधील तुमचं पात्र सुरुवातीपासूनच प्रेक्षकांना आश्चर्यचकित करतं आणि चित्रपटाच्या शेवटपर्यंत महत्त्वाचं राहतं. विशेष म्हणजे, प्रेक्षकांना त्याच्याबद्दल हळूहळू कळत जातं. जेव्हा हा चित्रपट तुमच्याकडे आला, तेव्हा तुम्हाला तुमच्या पात्राबद्दल आणि कथेबद्दल किती माहिती होती?**

» **नवनीत :** खरं तर अनुराग सरांचे चित्रपट खूप वेगळे असतात. आम्हाला संपूर्ण कथेबद्दल किंवा पात्राबद्दल आधीच जास्त माहिती दिली जात नाही. 'बंदर'साठी, मी ॲसिड हल्ला करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पात्रासाठी ऑडिशन दिली होती. त्या दृश्यात एक पाठलागाचा प्रसंग होता आणि मी ऑडिशन शक्य तितकी वास्तववादी करण्याचा प्रयत्न केला. मी रस्त्यावर जाऊन तिथेच ते दृश्य चित्रित केलं. नंतर मला कळलं की हे दृश्य चित्रपटाचं सुरुवातीचं दृश्य होतं. अनुराग सरांना माझी ऑडिशन खूप आवडली आणि त्यांनी तिची खूप प्रशंसा केली. एक अभिनेता म्हणून माझ्यासाठी तो एक खूप खास क्षण होता, कारण मी नेहमीच त्यांच्या कामाचा चाहता राहिलो आहे. जेव्हा चित्रपट पूर्ण झाला आणि मी पाहिलं की कथेत माझ्या पात्राने किती महत्त्वाची भूमिका बजावली आहे, तेव्हा ते एक सुखद आश्चर्य होतं. मला आनंद आहे की प्रेक्षक या पात्राशी आणि त्याच्या प्रवासाशी एकरूप होऊ शकले.

**प्रश्न : 'बंदर'मधील दोन दृश्यांची प्रेक्षकांमध्ये विशेष चर्चा आहे: चित्रपटाच्या सुरुवातीचे पाठलागाचे दृश्य आणि क्लायमॅक्स. यापैकी कोणत्या दृश्याने एक अभिनेता म्हणून तुमची अधिक परीक्षा घेतली?**

» **नवनीत :** दोन्ही पूर्णपणे वेगवेगळी आव्हाने होती. पाठलागाच्या दृश्यासाठी शारीरिक ऊर्जा आणि टायमिंगची गरज होती, तर क्लायमॅक्स पूर्णपणे भावना आणि शांततेवर अवलंबून होता. वैयक्तिकरित्या क्लायमॅक्स अधिक आव्हानात्मक होता. कारण त्यात जास्त संवादांशिवाय खूप काही सांगायचे होते.

**प्रश्न : या चित्रपटात तुम्हाला बॉबी देओलसोबत स्क्रीन शेअर करण्याची संधी मिळाली. एक स्टार आणि एक कलाकार म्हणून त्यांच्यासोबत काम करताना तुम्ही काय शिकलात?**

» **नवनीत :** तो एक अद्भुत अनुभव होता. बॉबी देओल सर अत्यंत नम्र आणि सहकार्य करणारे आहेत. एवढे मोठे स्टार असूनही, सेटवर त्यांचा स्वभाव खूप मनमोकळा असतो. यशाच्या शिखरावर असतानाही जमिनीवर पाय ठेवून राहणे किती महत्त्वाचे आहे, हे मी त्यांच्याकडून शिकतो.



**प्रश्न : अनुराग कश्यपच्या चित्रपटांचे स्वतःचे एक अनोखे जग असते. एक अभिनेता म्हणून त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव किती वेगळा होता?**

» **नवनीत :** अनुराग सरांचा कलाकारावर विश्वास असतो. ते तुम्हाला पात्राबद्दल समजावून सांगतात, पण त्याचबरोबर ते साकारण्यासाठी तुम्हाला पुरेसा वावही देतात. त्यांच्यासोबत काम करताना असं वाटतं की आपण चित्रपटात नाही, तर एका जिवंत जगात आहोत. त्यांच्या चित्रपटांमधील वास्तववाद आणि बारकावे त्यांना खास बनवतात.

**प्रश्न : चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर, तुम्हाला प्रेक्षक आणि इंडस्ट्री या दोघांकडूनही खूप चांगला प्रतिसाद मिळाला. अशी कोणती प्रतिक्रिया किंवा फोन कॉल आहे का, जो तुम्ही कदाचित कधीही विसरणार नाही?**

» **नवनीत :** जेव्हा मला इंडस्ट्रीतील अशा काही कलाकारांचे फोन आले, ज्यांचं काम मी वर्षानुवर्षे पाहिलं आहे आणि ज्यांचं कौतुक केलं आहे, तो माझ्यासाठी खूप भावनिक क्षण होता. एका कलाकारासाठी, आपल्या समवयस्कांकडून मिळणारी प्रशंसा ही सर्वात मोठी उपलब्धी असते.

**प्रश्न : मुंबईतील तुमच्या संघर्षाला आणि प्रवासाला जवळपास एक दशक पूर्ण झाले आहे. आज मागे वळून पाहताना, कोणत्या धड्याने तुम्हाला सर्वात कणखर बनवले आहे?**

» **नवनीत :** संघर्ष हा प्रत्येक कलाकाराच्या कथेचा एक भाग असतो. ऑडिशन्स, नकार आणि प्रतीक्षा, मी या सर्वांचा अनुभव घेतला आहे. पण मी नेहमी स्वतःला सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले. मागे वळून पाहताना मला वाटतं की, तो संघर्षच माझी सर्वात मोठी संपत्ती होती. त्याने मला संयम आणि चिकाटीचं महत्त्व शिकवलं.

**प्रश्न : 'रेड २' सारख्या मोठ्या चित्रपटात अजय देवगणसोबत काम करण्याचा अनुभव तुमच्यासाठी किती खास होता?**

» **नवनीत :** अजय सर खरंच एक अप्रतिम अभिनेते आहेत. त्यांच्यासोबत काम केल्याने मला साधेपणा आणि शिस्त किती महत्त्वाची आहे याची जाणीव झाली. त्यांनी माझ्या कामाची प्रशंसा केली, ज्यामुळे मला खूप प्रोत्साहन मिळालं. असे अनुभव एका कलाकाराचा आत्मविश्वास वाढवतात.

**प्रश्न : 'बंदर' चित्रपटाबद्दल असलेली चर्चा पाहता, तुम्हाला वाटतं का की हा चित्रपट तुमच्या कारकिर्दीत एक नवीन अध्याय सुरू करू शकतो?**

» **नवनीत :** ही माझी आशा आहे, पण मी याकडे अंतिम ध्येय म्हणून नाही, तर एक नवीन पाऊल म्हणून पाहतो. जर या चित्रपटामुळे माझ्या कामावर लोकांचा विश्वास वाढला आणि मला अधिक आव्हानात्मक भूमिका मिळाल्या, तर मी याला यश मानेन.

## रुबिना दिलैक : विशेष मुलाखत

# वैयक्तिक-व्यावसायिक जीवनात संतुलन साधणे आव्हानात्मक, पण अशक्य नाही!

**रुबिना दिलैक एक प्रसिद्ध टेलिव्हिजन अभिनेत्री बऱ्याच काळापासून इंडस्ट्रीत आहेत. काळानुसार त्यांची प्रगतीच झाली आहे. फिक्शन शोज असोत, नॉन-फिक्शन शोज असोत किंवा रिॲलिटी शोज असोत, त्यांनी सर्वत्र आपली चमक दाखवली आहे. दोन जुळ्या मुलींची आई असलेल्या रुबिना केवळ फॅशनचेच नव्हे, तर कौटुंबिक आदर्शही घालून देतात. तिचा विश्वास आहे, की वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात संतुलन साधणे आव्हानात्मक आहे, पण अशक्य नाही. तिच्यासोबत एक खास मुलाखत...**



» मला निरोगी दिसायचे आहे... : रुबिना इंटरनेट आणि सोशल मीडियावर पोशाखांमुळे चर्चेत असते. ती स्वतःला कसे मेंटेन करते? या प्रश्नाच्या उत्तरात ती म्हणते, की तुम्हाला तुमचे मन आणि शरीर एका विशिष्ट पातळीच्या फिटनेसने सांभाळावे लागते; त्यानंतर सुंदर दिसणे हा एक उप-उत्पादन ठरतो. मी हे विशिष्ट आकार किंवा फिगरसाठी करत नाही. माझी ऊर्जा पातळी उच्च असावी आणि माझ्या कामगिरीवर परिणाम होऊ नये, म्हणूनच मी निरोगी राहण्यास प्राधान्य देते. यासाठी, मला शिस्तबद्ध राहायला आवडते, असे रुबिना म्हणाली.

» संसारात गुंतले होते, आता पुरे झाले... ; रुबिना आणि तिचा पती अभिनव शुक्ला यांच्या वैवाहिक जीवनात अनेक चढ-उतार आले आहेत. बिग बॉस १४ मध्ये जाण्यापूर्वी त्यांचे लग्न घटस्फोटाच्या उंबरठ्यावर होते. रुबिना म्हणते, की आम्ही आमच्या वैवाहिक जीवनातून हे शिकलो आहोत की बॉलिवूडने आम्हाला प्रेमाची एक कल्पना विकली आहे. पण प्रत्यक्षात तसे नसते. प्रेम ही एक रोजची वचनबद्धता आहे. जेव्हा तुम्ही सकाळी उठून तुमच्या जोडीदाराच्या डोळ्यात पाहता आणि त्यांच्यातील सर्व दोष, उणिवा आणि नकारात्मकता असूनही तुम्हाला त्यांच्यासोबत राहावेसे वाटते, ते प्रेम आहे. तुम्हाला तुमच्या नात्यावर सतत काम करावे लागते. पण जर तुम्हाला प्रश्न पडत असेल की, मी या माणसाच्या प्रेमात कशी पडले? तर त्या नात्यातून ताबडतोब बाहेर पडा. आमच्या लग्नात अभिनवने माझ्यावरची आशा कधीच सोडली नाही. अभिनवचा मला खूप मोठा आधार होता, असे रुबिना म्हणाली. ती जीवा आणि इधा या जुळ्या मुलींची आई आहे हे सर्वांना माहीत आहे, पण त्यांना वाढवण्यासाठी तिला तिचा नवरा अभिनवकडून पूर्ण पाठिंबा मिळाला आहे. ती म्हणते, की मुलांना वाढवण्यासाठी पालकत्वाची भागीदारी खूप महत्त्वाची आहे आणि आम्ही त्याच मार्गाने पुढे जात आहोत.

» म्हणतात, आई झाल्यानंतर मुख्य भूमिका मिळत नाहीत... : मातृत्व अनेकदा महिलांसाठी एक अडथळा ठरते. पण मनोरंजन विश्वातील अभिनेत्रींनाही या समस्येचा सामना करावा लागतो का? रुबिना म्हणते, की मला तुम्हाला हे सांगायचं आहे की, ६० ते ६५ टक्के महिला आई झाल्यानंतर पुन्हा कामावर रुजू होऊ शकत नाहीत, कारण त्यांना योग्य आधार मिळत नाही. आपण अशी व्यवस्था निर्माण केलेली नाही, जिथे नवीन माता आईची भूमिका सांभाळत आपले करिअर पुढे नेऊ शकतील. आमच्या कामाचे स्वरूपच असे झाले आहे की, लोक तुम्हाला लेबल लावू लागतात आणि तुमच्याबद्दल मत बनवू लागतात. 'तू आई झाली आहेस, तुझं वय वाढू लागलं आहे', 'तू वेगळी दिसू लागली आहेस'... त्यामुळे तुम्हाला खूप सकारात्मक आणि उत्साही मानसिकतेने काम करावे लागते आणि तुम्हाला सुंदरही दिसावे लागते. त्यामुळे एक वेगळ्या प्रकारचा दबाव असतो. अनेक लोकांनी तर मला असेही सांगितले की, जर मी आई झाले, तर मला मुख्य भूमिका मिळणार नाहीत. भीती आणि असुरक्षितता या दोन्ही गोष्टी मला छळतात, पण तुम्हाला त्यातून मार्ग काढावाच लागतो. आई झाल्यापासून मी खूप काम आणि प्रोजेक्ट्स गमावले आहेत, असे रुबिना म्हणाली.

# सनी देओलना सेटवर कामाशिवाय दुसरं काहीच दिसत नाही... : मनीष वाधवा

**'गदर २' आणि 'पठाण' सारख्या सुपरहिट चित्रपटांमध्ये आणि 'सिया के राम' व 'चंद्रगुप्त मौर्य' सारख्या मालिकांमध्ये झळकलेला मनीष वाधवा सध्या 'हस्तिनापूर के वीर'मध्ये दिसत आहे. या मालिकेत तो गंगापुत्र देवव्रत (भीष्म पितामह) यांची भूमिका साकारत आहेत. याबद्दल तो सांगतो, की भीष्म पितामहांचे पात्र खूप बहुआयामी आहे. भीष्मांनी ज्या प्रकारे मार्गदर्शन केले आणि सर्वांची प्रगती पाहिली, ते मला खूपच आश्चर्यकारक आणि प्रभावी वाटले. ते सत्याला पाठिंबा देऊ शकले असते, पण मग शपथ होती. त्यामुळे हे एक खूप गहन पात्र आहे, जे सत्याला पाठिंबा देऊ इच्छिते पण शपथेने बांधलेले देखील आहे...**



» मुकेश खन्नाजींची बरोबरी करू शकत नाही... : मुकेश खन्ना यांच्याशी होणाऱ्या तुलनेबद्दल मनीष म्हणतो, की मुकेश खन्ना यांनी जे यश मिळवलं आहे, जर आम्ही त्या पातळीपर्यंत पोहोचू शकलो, तर ती खूप मोठी गोष्ट असेल. आम्ही त्यांना बघत मोठे झालो आहोत, लहानपणापासून त्यांना बघत आलो आहोत. साहजिकच, काही लोक तुलना करतील. पण मी म्हणेन की तुलना होऊच शकत नाही. त्यांनी आधीच खूप चांगलं काम केलं आहे आणि मी ते स्वीकारलं आहे. मी प्रेक्षकांना हेही सांगू इच्छितो की त्यांनी तुलना करू नये.

» सनी देओलसोबत तासनतास बोललो... : मनीष वाधवाने 'गदर २' मध्ये सनी देओलसोबत काम केले होते. या चित्रपटातही त्याचे सनी देओलसोबत ॲक्शन सीन होते. सनी देओलसोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल तो म्हणतो, की ते खूप नम्र व्यक्ती आहेत. त्यांच्या मनात प्रत्येकासाठी इतकं प्रेम आणि त्यांच्या कामाप्रती इतकी निष्ठा आहे की सेटवर त्यांना कामाशिवाय दुसरं काहीच दिसत नाही. ते सेटवर एका खुर्चीवर बसून सगळं काही पाहत असतात. मी त्यांच्याकडून खूप काही शिकलो. सनी देओलसोबतच्या त्याच्या फाईट सीन्सबद्दल मनीष म्हणतो, की आम्ही शूटिंगदरम्यान ॲक्शनवर चर्चा करायचो. मी त्यांच्यासोबत दुसऱ्या एका प्रोजेक्टवर काम करत आहे. त्यामुळे आम्ही अजूनही त्याच्यासोबत ॲक्शनवर चर्चा करतो. मी त्यांच्याकडून खूप काही शिकलो, असेही मनीष म्हणाला.

## माधुरी दीक्षित : विशेष मुलाखत

# बोलणे लोकांचे कामच, मी आनंद वाटेल ते करत राहते...

**आपल्या समाजात स्त्रियांच्या चारित्र्याचे मूल्यमापन त्यांच्या कपड्यांच्या लांबीवरून केले जाते आणि माधुरी दीक्षितचा नवीन चित्रपट 'माँ बहन' याच मानसिकतेवर हल्ला करतो. सर्व सामाजिक रूढी मोडणाऱ्या रेखाची भूमिका साकारणाऱ्या माधुरी दीक्षितला स्वत :लाही लोकांच्या टीकेला सामोरे जावे लागले आहे, पण ती त्याकडे दुर्लक्ष करून स्वत :च्या इच्छेनुसार आयुष्य जगण्यावर विश्वास ठेवते.**



### आनंद वाटतो, तेच करा...

लोकांच्या टीकेबद्दल माधुरी म्हणते, की समाज मुळातच टीका करणारा आहे. तुम्ही पडद्यावर असाल किंवा कोणत्याही व्यवसायात, आपल्यावर टीका केली जाते, विशेषतः अविवाहित महिलांवर तर अधिकच. जर त्या कामावरून उशिरा आल्या, तर लोक टिप्पणी करू लागतात, अरे, तिला किती उशीर झाला. आमच्या व्यवसायातही तेच आहे : अगं, तू आता आई झाली आहेस, तरीही काम का करत आहेस? किंवा हे नाचण्याचे वय आहे का? अशा टिप्पण्या येतात आणि आम्हाला त्यांचा सामना करावा लागतो. पण माझा विश्वास आहे की टीका होत असली तरी, जे तुम्हाला आनंद देईल तेच तुम्ही केले पाहिजे. टीका केल्याने कदाचित त्यांना आनंद मिळत असेल, पण आपण स्वतःमध्ये आनंदी असले पाहिजे, असे माधुरी म्हणाली.

» वैयक्तिक आयुष्यात माधुरीचे तिच्या मुलांसोबत कसे जमते? यावर ती हसून म्हणते, की आई होणे म्हणजे चिंता. त्यानंतर आयुष्यात गोंधळ सुरू होतो, कारण प्रत्येक मूल वेगळे असते आणि तुम्हाला त्यांना समजून घ्यावे लागते. मुलाचे संगोपन कोणत्याही नियमावलीनुसार करता येत नाही. तुम्ही जसजसे पुढे जाता, तसतसे अनुभवातून शिकत जाता. मुले तुम्हाला शिकवतात, त्यामुळे हा आयुष्याचा एक वेगळा प्रवास आहे जो तुम्ही तुमच्या मुलासोबत करता.

### नृत्याने मला आनंद मिळतो...

आजच्या सोशल मीडियाच्या युगात, वयावरून आणि वजनावरून हिणवणे खूप सामान्य झाले आहे. या ट्रेंडबद्दल माधुरी म्हणते, की वयानुसार बदल होणारच. चेहरे बदलतील, शरीर बदलेल, पण मी तेच सांगेनः लोक काही ना काही बोलणारच, बोलणे हे त्यांचे कामच आहे. लोकांच्या मतांचा तुमच्या आयुष्यावर इतका परिणाम होता कामा नये. जे तुम्हाला आनंद देते ते करा. उदाहरणार्थ, जर मला नृत्य करायला आवडत असेल, तर मी ते करेन. कारण त्यामुळे मला आनंद मिळतो. तुम्ही तुमचे आयुष्य लोकांच्या मतांनुसार जगू शकत नाही. तुम्हाला हवे तसे तुमचे आयुष्य जगा; लोक बोलतच राहतील. हो, कधीकधी लोक असे का बोलत आहेत याचा विचार करून वाईट वाटते, पण ते इतके गांभीर्याने घेऊ नका की त्याचा तुमच्या आयुष्यावर परिणाम होऊ लागेल. वयाच्या ५९ व्या वर्षीही अविश्वसनीयपणे सुंदर आणि फिट असलेल्या माधुरीच्या फिटनेसच्या रहस्याबद्दल विचारले असता, ती म्हणते, की हे सर्व शिस्तीमुळे आहे. आहाराची काळजी घेणे, व्यायाम करणे... माझ्यासाठी नृत्य हा एक मोठा व्यायाम आहे. योग्य वेळी झोपणे, वाईट सवयी टाळणे या सर्व गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

### आजचे कलाकार खूप तयारी करून येतात...

माधुरीने तिच्या पिढीतील आणि नवीन पिढीतील अशा दोन्ही कलाकारांसोबत काम केले आहे. या दोन पिढ्यांमध्ये तिला काय फरक दिसतो? असे विचारल्यावर ती म्हणते, की जेव्हा पूर्वीचे कलाकार इंडस्ट्रीत आले, तेव्हा त्यांना चित्रपटांबद्दल काहीच माहिती नव्हती. आम्ही पूर्णपणे अननुभवी होतो. सेटवर काम कसे चालते हेसुद्धा आम्हाला माहीत नव्हते. आम्ही सर्व काही काम करता करता शिकलो, पण आजची पिढी अभिनय आणि नृत्याच्या अनेक वर्गांमधून आलेली आहे. त्यांनी अभिनयाचा अभ्यास केला आहे. त्यांनी रील्स बनवल्या आहेत. उदाहरणार्थ, जेव्हा मी धारणाकडे (इन्फ्लुएन्सर सह-कलाकार धारणा दुर्गा) पाहते, तेव्हा मला तिचा खूप अभिमान वाटतो. कारण ती स्वतःची सामग्री स्वतः लिहिते. तिचं निरीक्षण इतकं अचूक असतं आणि मग ती त्याला विनोदात रूपांतरित करून लोकांना हसवते, हे खरंच अप्रतिम आहे. आपल्याकडे खूप कमी महिला विनोदी कलाकार आहेत. त्यामुळे आज जेव्हा मी मुलींना स्टँड-अप कॉमेडी करताना पाहते, तेव्हा मला खूप आनंद होतो. त्याचप्रमाणे तृप्ती डिमरीने काही अप्रतिम चित्रपट केले आहेत, ज्यामुळे तिला ओळख मिळाली आहे. या चित्रपटातील तिचा अभिनयही उत्कृष्ट आहे, त्यामुळे इतक्या कमी वेळात एवढं यश मिळवल्याबद्दल मला तिचा खूप अभिमान वाटतो.



# ‘टीएमसी’ची तब्बल १,३०० कोटींहून अधिक रकमेची तीन बँक खाती गोठवली

**कोलकत्ता (वृत्तसंस्था)** – पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली आहे. निवडणुकीतील पराभवानंतर अंतर्गत संघर्षाने ग्रासलेल्या तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का बसला असून पक्षाची एचडीएफसी बँकेतील तीन महत्त्वाची खाती गोठवण्यात आली आहेत. या खात्यांमधून कोणताही आर्थिक व्यवहार करण्यास सध्या बंदी घालण्यात आली असून प्रत्येक खात्यात तब्बल ४४० कोटी रुपये जमा असल्याचे समोर आले आहे.



पक्षाचे माजी खजिनदार अरूप बिस्वास यांनी एचडीएफसी बँकेला पत्र लिहून पक्षाची खाती गोठवण्याची मागणी केली होती. पक्षाचे खरे नेतृत्व कोणाकडे आहे, याबाबत गंभीर वाद सुरू असल्याने निधीच्या सुरक्षेसाठी तातडीची पावले उचलण्याची गरज असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले होते. विशेष म्हणजे, याच महिन्याच्या सुरुवातीला अरूप बिस्वास यांना खजिनदारपदावरून हटवण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी केलेल्या या हालचालीमुळे पक्षातील संघर्ष आणखी तीव्र झाल्याचे मानले जात आहे.

या घडामोडी अशा वेळी समोर आल्या आहेत, जेव्हा टीएमसीचे २० लोकसभा खासदार सभापती ओम बिरला यांची भेट घेऊन नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियामध्ये विलीन होण्याची घोषणा केल्याचा दावा करण्यात आला आहे. बंडखोर गटाने आपणच खरी तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करत पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह आणि मालमत्तेवर हक्क सांगितला आहे. त्यामुळे पक्षातील सत्तासंघर्ष आता थेट आर्थिक मालमत्ता आणि निधीच्या नियंत्रणापर्यंत पोहोचला आहे.

निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या २०२४-२५ च्या लेखापरीक्षण अहवालानुसार, तृणमूल काँग्रेसची एकूण मालमत्ता १,०८१.७८ कोटी रुपये इतकी आहे. यामध्ये ६२५.७८ कोटी रुपये विविध बँक खात्यांमध्ये, २५०.७७ कोटी रुपये गुंतवणुकीत तर ५० कोटी रुपये धनादेशांच्या स्वरूपात असल्याची नोंद आहे.

अरूप बिस्वास यांनी बँकेला पाठवलेल्या पत्रात खात्यांमधील निधी सुरक्षित ठेवण्यासाठी कोणतेही डेबिट व्यवहार, निधी हस्तांतरण किंवा खात्यांच्या कार्यपद्धतीत बदल करण्यास मनाई करण्याची मागणी केली होती. पक्षाच्या नेतृत्वावरून निर्माण झालेला वाद निकाली निघेपर्यंत निधीचा गैरवापर होऊ नये, तसेच अनधिकृत व्यक्तींना आर्थिक व्यवहार करता येऊ नयेत, यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बिस्वास यांनी दावा केला की, पक्षाचे कामकाज, आर्थिक व्यवहार आणि मालमत्तेच्या नियंत्रणावरून गंभीर मतभेद निर्माण झाले आहेत. अशा परिस्थितीत पक्षाचा निधी केवळ कायदेशीर आणि अधिकृत नेतृत्वाकडेच राहणे आवश्यक आहे. या सर्व घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेससमोर केवळ राजकीयच नव्हे तर आर्थिक आणि संघटनात्मक संकटही उभे ठाकल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

## लेबनॉनवरील इस्रायली हल्ल्यात १६ जण ठार

**तेल अवीव (वृत्तसंस्था)** – इराणने होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा बंद केली आहे. इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने सरकारी टीव्हीवर जाहीर केले की, लेबनॉनमधील इस्रायली हल्ले हे यामागील कारण आहे.

१७ जूनच्या रात्री अमेरिका आणि इराण यांच्यात एक शांतता करार झाला होता. या करारानुसार होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे आणि लेबनॉनमधील हल्ले थांबवणे असे ठरले होते. शांतता करार झाल्यानंतरही इस्रायलने लेबनॉनमधील हल्ले सुरूच ठेवले.

यानंतर, ट्रम्प यांच्या पुढाकाराने १९ जूनच्या रात्री इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम जाहीर करण्यात आला. मात्र, युद्धविराम जाहीर झाल्यानंतर अवघ्या आठ तासांतच इस्रायल आणि लेबनॉनमध्ये लढाई सुरू झाली. अल जझीराच्या वृत्तानुसार, इस्रायली सैन्याने ड्रोन आणि तोफखान्याच्या साहाय्याने नबाहिता भागावर हल्ला केला, ज्यात किमान १६ जण ठार झाले.

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले आहे की, इस्रायल आपल्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करणार नाही. त्यांनी सांगितले की, इस्रायल गाझा आणि लेबनॉनमध्ये आपली लष्करी कारवाई सुरूच ठेवेल.

### पवनराजे निंबाळकर खटल्याचा निकाल विरोधात जाताच ओमराजेंचं वक्तव्य

## ‘शिंदे गटात जायचं की नाही, अजून ठरवलं नाही’

**मुंबई (प्रतिनिधी)** – ठाकरे गटाचे संभाव्य फुटीर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी पवनराजे निंबाळकर हत्याप्रकरण खटल्याच्या निकालानंतर एक महत्त्वाचे वक्तव्य केले आहे. कालपर्यंत ओमराजे निंबाळकर हे शिंदे गटात गेले असे समजून ठाकरे गटाच्या नेत्यांनी त्यांचा उद्धार केला होता. आपण पवनराजे निंबाळकर खटल्याच्या निकालानंतर शिंदे गटात जाण्याचा राजकीय निर्णय घेऊ, असे ओमराजे यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते. आज हा निकाल विरोधात गेल्यानंतर प्रसारमाध्यमांनी ओमराजे निंबाळकर यांना प्रतिक्रिया विचारली असता ते म्हणाले की, शिंदे गटात जाण्याबाबत निर्णय मी अद्याप घेतलेला नाही. मी माझ्या मतदारसंघात जाऊन कार्यकर्त्यांशी चर्चा करेन आणि हा निर्णय घेईन. या खटल्याचा निकाल आणि माझा राजकीय निर्णय याचा संबंध नाही. सध्या कलियुग आहे, असे ओमराजे निंबाळकर यांनी म्हटले. कालपर्यंत ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटाच गेल्याचे जवळपास निश्चित मानले जात होते.

त्यांच्या प्रवेशाची केवळ औपचारिकता शिल्लक होती. मात्र, आता ओमराजे निंबाळकर यांच्या वक्तव्याने ते शिंदे गटात जाणार की नाही, याबाबतचा सस्पेन्स पुन्हा वाढला आहे. दरम्यान, या खटल्याचा निकाल ओमराजे निंबाळकर यांच्या विरोधात गेल्याने त्यांना मोठा धक्का बसला आहे. २० वर्षांच्या दीर्घ न्यायालयीन लढ्यात त्यांना अपयश आले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फोनवरुन लगेच गृहमंत्री अमित शाह यांच्याशी बातचीत केली आहे. या खटल्यात सीबीआयने वरिष्ठ कोर्टात जाण्यासंदर्भात या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्याचे समजते.





### ओमराजेंच्या घरवापसीचा निर्णय उद्धव ठाकरे घेतील - खा. अनिल देसाई

ओमराजे यांच्या जीवनातील सर्वात मोठा संघर्ष त्यांच्या वडिलांची हत्या झाल्यानंतर ते प्रकरण कोर्टात गेलं होतं. २० वर्ष ते याचा पाठपुरावा करत होते, सुनावणी झाली, न्यायालयीन प्रक्रियेतील गोष्टी झाल्या. शिवसेनेची बैठक बोलावली होती, ओमराजे यांनी पक्षाच्या शिस्तीचा भंग केला, ते बैठकीला आले नाहीत. २० तारखेला निकाल लागला नंतर निर्णय घेऊ म्हणत होते. ओमराजे निंबाळकर यांच्या पदरी संघर्षानंतर निराशा आली आहे. तुम्ही म्हणताय त्याप्रमाणे आता जर ते आमच्या सोबत राहण्याचा विचार करत असतील तर त्यावर निर्णय पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे निर्णय घेण्यास सक्षम आहेत, असं अनिल देसाई म्हणाले.

# निवडणूक प्रक्रियेकडे दुर्लक्ष होण्यासाठी पांढऱ्या पट्ट्यांचे राजकारण

## राज ठाकरे यांची टीका; ‘ऑपरेशन टायगर’सह सध्याच्या राजकीय स्थितीवर केले भाष्य

**मुंबई (प्रतिनिधी)** – ‘एसआयआर’सह निवडणूक प्रक्रियेकडे आणि राज्यातील ज्वलंत प्रश्नांकडे जनतेचे पूर्णपणे दुर्लक्ष व्हावे, यासाठीच सध्या ’पांढऱ्या पट्ट्यांचे राजकारण’ जाणीवपूर्वक सुरू करण्यात आले आहे. लोकांना अशा भावनिक आंदोलनांमध्ये गुंतवून ठेवायचे आणि आडोशाने आपले राजकीय उखळ पांढरे करून घ्यायचे, हा काही लोकांचा धंदाच झाला आहे, अशा तिखट शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जैन मुनींच्या नावाने राजकारण करणाऱ्यांवर कडाडून टीका केली आहे.

मुंबईत आयोजित मनसे पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना त्यांनी शहरातील पांढऱ्या पट्ट्यांच्या वादावर तसेच राज्यात सुरू असलेल्या ‘ऑपरेशन टायगर’वर भाष्य केले. राज ठाकरे म्हणाले, आम्हाला प्रत्येक धर्माबद्दल आदर आहे. अनेक जैन बांधव वर्षानुवर्षे मुंबईत राहत आहेत आणि त्यांचे मुनी उत्तम काम करत आहेत. पण दुर्दैवाने, त्यातील काही मुनी सध्या भाजपच्या कच्छपी लागले असून तिथे राजकारण करत आहेत. एका कुरळ्या केसांच्या आणि दाढी ठेवून फिरणाऱ्या व्यक्तीला तर कोणी मुनीही म्हणत नाही. तो म्हणतो आम्ही हातात बांगड्या भरलेल्या नाहीत; पण तुम्ही कधी मराठी माणसाचे मनगट पाहिले आहे का? आम्हाला कोणतेही वाद नको आहेत, पण कोणी स्वतःहून वाद उकरून काढणार असेल, तर आम्ही रस्त्यावर उभे राहू. अनेक मुनी नेहमीच रस्त्यावरून किंवा हायवेवरून पायी फिरत असतात, तेव्हा तुम्हाला पांढऱ्या पट्ट्यांची गरज लागत नाही. मग आताच सोसायट्यांमध्ये पांढरे पट्टे मारून तुम्ही तुमचे अस्तित्व दाखवत आहात का? मध्यंतरी कबुतरांचा विषय काढला, आता हा पांढऱ्या पट्ट्यांचा विषय पुढे आणला आहे. हे काही लोक राजकीय पक्षांच्या नादी लागून करत आहेत आणि यात जनतेला नाहक अडकवून ठेवले जात आहे.

‘ऑपरेशन टायगर’वर बोलताना राज म्हणाले, आपण आपल्या राज्याचे आणि देशाचे काय नुकसान करतोय, याचा विचार करायला हवा. आज राज्यात बेरोजगारीचे प्रमाण कमालीचे वाढले आहे, अजून पाऊस पडलेला नाही, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार आहे; आणि इथे मात्र सत्ताधाऱ्यांचे खासदार, आमदार आणि नगरसेवक फोडण्याचे सत्र सुरू आहे! आपली सत्ता कशी टिकेल, फक्त याच एका गोष्टीचा विचार सध्या सुरू आहे. यासाठी वाट्टेल तितके पैसे द्यायला हे तयार आहेत आणि माणसेही विकली जात आहेत. ज्या लोकप्रतिनिधींना निवडून आणण्यासाठी जनता पाच-पाच तास रांगेत उभे राहते, तेच लोक जर ५०-१०० कोटींसाठी विकले जात असतील, तर त्यांना तुम्ही पुन्हा उभे करणार का? आता ते जर परत तुमच्याकडे मते मागण्यासाठी आले, तर तुमची प्रतिक्रिया काय असणार? आम्ही आमच्या भविष्यातील पिढ्यांना काय सांगणार आहोत? आम्ही विकले गेलो आहोत, हे सांगणार का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला



देशातील आणि राज्यातील वाढत्या आत्महत्यांच्या आकडेवारीवर बोट ठेवत राज ठाकरे यांनी थेट सरकारवर हल्ला चढवला. ते म्हणाले, आज देशात आत्महत्यांचे प्रमाण किती वाढले आहे, याची आकडेवारी समोर आहे. मध्य प्रदेशमध्ये १५ हजार, गुजरातमध्ये ८ हजार आणि दुर्दैवाने सर्वांत जास्त म्हणजे २२ हजार १७४ आत्महत्या आपल्या महाराष्ट्रात झाल्या आहेत. आज शेतकरी आणि विद्यार्थी आत्महत्या करत आहेत, दुसरीकडे ‘नीट’ परीक्षेचे पेपर फुटत आहेत. जेव्हा ‘नीट’ परीक्षा आणली गेली, तेव्हाच मी तिला जाहीर विरोध केला होता. आज लहान मुलांना आणि मुलींना पळवण्याचे प्रकार वाढले आहेत. जसे खासदार-आमदार पळवले जातात, तशाच मुली पळवून त्यांना वेश्या व्यवसायात ढकलले जात आहे. पण दुर्दैवाने या पळवापळवीच्या राजकारणात आपण मूळ आणि महत्त्वाच्या गोष्टी पूर्णपणे विसरून जात आहोत.


प्रवेश देणे चालू आहे

शासन मान्य

इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवी द्वारा संचलित...

**कमला नेहरु मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह मांडवी**

**ता.किनवट जि.नांदेड**

सदरील शासन मान्य अनुदानित मागासवर्गीय मुलींच्या वसतिगहात शैक्षणिक वर्ष 2026-2027 या वर्षासाठी इयत्ता 5 वी ते 10 वी मध्ये शिकत असलेल्या व स्थानिक विद्यालयात प्रवेश घेणा-या गरजू व होतकरु मागासवर्गीय मुलींना खालील प्रमाणे जातनिहाय टक्केवारीनुसार प्रवेश देणे चालू आहे.

| अ.क्र. | जातीचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | अनुसुचित जाती (SC) | 67% |
| 2. | अनुसुचित जमाती (ST) | 14% |
| 3. | विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJNT) | 17% |
| 4. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | 2% |
| | एकूण | 100% |
| 5. | इतर मागास प्रवर्ग (OBC) | 15% |
| 6. | बिगर मागास प्रवर्ग (OPEN) | 5% |

**वसतिगृहाची वैशिष्ट्ये :** 1. सुसज्य इमारत 2. जेवनाची व राहण्याची उत्तम व्यवस्था 3.गरम पाण्यासाठी सोलार 4. सुरक्षा व्यवस्थेसाठी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे 5. पिण्याच्या पाण्यासाठी ॲरो 6. स्वतंत्र अभ्यासिका 6. शाळेत जाण्यासाठी स्कूल बस 7.ग्रंथालयाची सुविधा 8. 100% निकालाची परंपरा 6. अभ्यासाकडे विशेष लक्ष

टीप: एकूण मान्या संख्येच्या 20% 1. इतर मागास प्रवर्ग (OBC) - 15% 2. बिगर मागास प्रवर्ग (OPEN) - 5% मुलींना प्रवेश दिल्या जाईल.

अध्यक्ष, इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवी | अधिक्षीका, कमला नेहरु मागासर्गीय मुलींचे वसतिगृह मांडवी ता.किनवट जि. नांदेड | सचिव, इंदिराबाई राठोड ट्रस्ट मांडवी

संपर्क:- 9403533391, 9420072308


### जाहीर प्रगटन
**नगर परिषद, भोकर**
नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, शेख इलियास शेख अहेमद यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगर परिषद हद्दितील शेत सर्व्हे नं. ..... गट नं. ५९५, जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. .., मालमत्ता क्र. २६०७/११, नवीन वार्ड नं. (०२) नवीन मालमत्ता नं. २४२९ साईज पूर्व-पश्चिम : ४.५७ मीटर, दक्षिण-उत्तर : १५.२४ मीटर.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : ४.५ मी. रस्ता, **पश्चिमेस** : पैकी भाग, **दक्षिणेस** : ६.१० मी. रस्ता, **उत्तरेस** : गट नं. ५९५.

अब्दुल सलाम अब्दुल वली यांच्या नावे असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचे काहीही आक्षेप नाहित असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात यईल याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

### टी.सी. हरवली

माझी कु. अस्मिता अचुतराव सकनुरे या नावाची इयत्ता १२ वी विज्ञान या शाखेची टी.सी. मुखेड ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणास सापडल्यास खालील मो.नं. वर संपर्क करावा.

**अचूतराव सकनुरे**
**मो.नं. ९९७०८३७११३**

### Change In Name

My old name is **MOHAMMAD ABDUL MUBEEN** Which now I am Changing as new Name **ABDUL MUBEEN** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same.

**Address**
**H.No. 9-5-642/1, Hamidiya Colony, Tyre Board, Near Hizra Masjid, Po. Itwara Nanded M.S. 431604 Mo.No. 9960097216**

### Change In Name

My old name is **Vijay Vithalrao Muttepawar** Which now I am Changing as new Name **Vijay Vithal Muttepawar** Hence forth my all correspondence Will be done as per my new name. Please consider, the same.

**Address**
**H.No. 4, Omkar Niwas, Sahyadri Nagar, Near Taroda Bk. Nanded 431605 Mo.No. 9860075089**

### जाहीर प्रगटन

नांदेड जिल्हा व देगलूर परिसरातील विशेषतः मौजे देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथील सर्व जनतेला या जाहिर प्रगटनद्वारे सुचित करण्यात येत आहे व येत आहे व माझे पक्षकार भूदेवी भ्र लालन्ना पोतगंटीवार मूदेवी पि. सय्याजी निरडी (मामीडवार) रा. गडडी गल्ली देगलूर ता. देगलूर, जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन मी आपणास खलीलप्रमाणे कायदेशीर नोटीस देत आहेत.

हे की, मौजे देगलूर स्थित सर्वे नं. २१३ ज. एकुण क्षेत्र ० हे २१ जारचे मालक व कब्जेदार माझे पक्षकार असून त्याना सदरील जमीन त्याच्या वडिलांकडुन प्राप्त प्राप्त झाली आहे. सदरचे मालमत्ता माझ्या पक्षकाराची वडिलापाजीत व स्वकष्टीत मालमत्ता आहे. सदर नालमत्तेशी आपला कसल्याही प्रकारचा संबंध नाही

हे की. सन २०१९ मध्ये सदरील मालमत्ते विषयी काही वाट निर्माण वाद निर्माण झालेमुळे तसेच, माझे पक्षकार वयस्कर असल्याने अनेक आजाराने ग्रस्त असल्याने त्याचे पुत्र श्री लक्ष्मण पिला तसेच, त्याच्यावर विश्वास असल्यामुळे माड्या पक्षकाराने विशेष अधिकार पत्र लक्ष्मण पि. लालन्ना पोवनंटीवार असल्यामुळे न्यायालयीन कामाजासाठी करुन दिला होता. परंतु आपण सदरील न्यायालयीन प्रक्रीयेत प्रत्यक्ष भाग न घेता पत्र (आममुक्त्यार नामा) फक्त तसेच माझ्या पक्षकारास सदरील न्यायालयाच्या खटयाल्या सदनांत कसलीही माहिती देत नाहीत तसेच, आपण माझ्या पक्षकाराचे सख्खे पुत्र असुनही त्यांच्याकडे दुर्लक्ष करित आहात. सध्या माझ्या पक्षकारास आजारपणामुळे औषधोपचाराची गरज असुनही आपण मुद्दाम त्यांच्याकडे दुर्लक्ष करित आहात. आपल्या वरिलप्रमाणे वागण्यामुळे माझे पक्षकाराचे आपल्यावर विश्वास राहिलेला नाही सदरील मालमत्ता ही माझ्या पक्षकाराच्या वडिलांनी तिला तिच्या वयोवृष्ट अवस्थेत पालनपोषणाचा स्त्रोत म्हणून दिली होती परंतु आपण त्याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे सदरील मालमत्तेचा उपभोग घेणे माझ्या पक्षकारास असाहय झाले आहे म्हणुन सदरील जाहिर प्रगटन वर्तमान पत्रात प्रसारित आले पासुन ७ दिवसांच्या आत आत सदरील करुन दिलेले विशेष अधिकार पत्र माझ्या पक्ष कारास मुळ प्रतिसह परत आणून देणे तसेच सदरील जाहिर प्रगटन प्रत्सारित झाले पासुन ७ दिवसाच्या आत सदरील विशेष अधिकार पत्र (आम मुक्त्यार नामा) रद्द समजण्यात येईल. त्याउपरही आपण सदरील दस्ताचे गैरवापर केल्यास आपल्या विरुच्दा योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**तर्फे – ॲड. संजय माधवराव देशमुख,**
**(ॲडव्होकेट, देगलूर)**
**जाहीर प्रगटन देणार –**
**भुदेवी भ्र. लालन्ना पोतगंटीवार उर्फ**
**भूदेवी पि. सय्याजी निरडी (मामीडवार)**
**रा. देगलूर ता. देगलूर ह.मु. नांदेड.**


कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




### जाहीर प्रगटन

कृपासिंधु टॉवर्स ईस्ट साईड विंग सदनिकाधारक सहकारी गृहनिर्माण संस्था म. छत्रपती चौक वाडी (बु) ता. जि. नांदेड

कृपासिंधु टॉवर्स ईस्ट साईड विंग सदनिकाधारक सहकारी गृहनिर्माण संस्था म. छत्रपती चौक वाडी (बु) नादेड. या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२६ ते २०३१ साठीची प्रारूप मतदार यादी संस्थेने कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर कृपासिंधु टॉवर्स ईस्ट साईड विंग सदनिकाधारक सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. छत्रपती चौक वाडी (बु) नादेड येथे लावण्यात आलेली आहे. सदर मतदार यादीवर संस्थेच्या सभासदांपैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक २०/०६/२०२६ ते २७/०६/२०२६ पर्यंत सस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरुपात आक्षेप नोंदवावेत, कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

**निवडणूक निर्णय अधिकारी**
**(एस. बी. लांडगे)**
**कृपासिंधु टॉवर्स ईस्ट साईड विंग सदनिकाधारक**
**सह. गृह. सं. मर्या. छत्रपती चौक, वाडी (बु) नांदेड**
**९६७३४००३४९**
**अध्यक्ष सचिव**
**कृपासिंधु टॉवर्स ईस्ट साईड विंग सदनिकाधारक**
**सह. गृह. सं. मर्या. छत्रपतीचौक, वाडी (बु) नांदेड**
**मो.नं. ९४२२६६९४०७ / ९६०४३३४२०३**

### जाहीर प्रगटन
**नगर परिषद, भोकर**
नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, प्रभाकर खंडू मोतेकर यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगर परिषद हद्दितील शेत सर्व्हे नं. ..... गट नं. २७९, जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. १३, मालमत्ता क्र. सी-३१४, नवीन वार्ड नं. (१६) नवीन मालमत्ता नं. १७४४/१३ साईज पूर्व-पश्चिम : १५.२४ मीटर, दक्षिण-उत्तर : ९.१४ मीटर.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : प्लॉट नं. १४, **पश्चिमेस** : २० फुट रस्ता, **दक्षिणेस** : २० फुट रस्ता, **उत्तरेस** : प्लॉट नं. ७.

सुधाकर गुंडाजी कांबळे यांच्या नावे असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचे काहीही आक्षेप नाहित असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात यईल याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

### जाहीर प्रगटन
**नगर परिषद, भोकर**
नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मोहम्मद आवेस मोहम्मद अल्ताफ, मोहम्मद आमीर मोहम्मद अल्ताफ यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगर परिषद हद्दितील शेत सर्व्हे नं. ..... गट नं. .., जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. .., मालमत्ता क्र. ए-१४९ नवीन वार्ड नं. (..) नवीन मालमत्ता नं. ... साईज पूर्व-पश्चिम : १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर : ९.१४ मीटर.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : २० फुट रस्ता, **पश्चिमेस** : प्लॉट नं. ७६, **दक्षिणेस** : प्लॉट नं. ६०, **उत्तरेस** : प्लॉट नं. ५८.

तबस्सुम बेगम सत्तार खान यांच्या नावे असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचे काहीही आक्षेप नाहित असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात यईल याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

### जाहीर प्रगटन
**नगर परिषद, भोकर**
नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, मोहम्मद आवेस मोहम्मद अल्ताफ भोसानी यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगर परिषद हद्दितील शेत सर्व्हे नं. ..... गट नं. ६०२, जुना वार्ड नं. (०५) मधील प्लॉट नं. ७२, मालमत्ता क्र. ए-१२५ नवीन वार्ड नं. (०१) नवीन मालमत्ता नं. २३८५ साईज पूर्व-पश्चिम : १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर : ९.१४ मीटर.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : प्लॉट नं. ७१, **पश्चिमेस** : २० फुट रोड, **दक्षिणेस** : प्लॉट नं. ५४, **उत्तरेस** : १५ फुट रस्ता.

साजीद खान मोहम्मद खान यांच्या नावे असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचे काहीही आक्षेप नाहित असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात यईल याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

### जाहीर प्रगटन
**नगर परिषद, भोकर**
नाव परिवर्तन करणे बाबत.

या जाहीर प्रगटनाआधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, पौर्णिमाताई सुभाष राठोड यांनी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगर परिषद हद्दितील शेत सर्व्हे नं. ..... गट नं. ०९, जुना वार्ड नं. (०३) मधील प्लॉट नं. २७, मालमत्ता क्र. २८८७/३२ नवीन वार्ड नं. (०२) नवीन मालमत्ता नं. २९१६/३२ साईज पूर्व-पश्चिम : १२.१९ मीटर, दक्षिण-उत्तर : ९.१४ मीटर.

**चतु:सिमा :**
**पूर्वेस** : प्लॉट नं. १६, **पश्चिमेस** : रस्ता, **दक्षिणेस** : रस्ता, **उत्तरेस** : प्लॉट नं. २६

अमित अशोक चिंतावार यांच्या नावे असलेली मालमत्ता खरेदीखता आधारे / वारसा आधारे माझ्या नावे नाव परिवर्तन करण्यात यावे, अशी विनंती संचिका सादर केली आहे.

तरी त्यांचे नाव कर आकारणी नोंद वहीत घेण्यात येत आहे. त्या संबंधी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी सात दिवसांच्या आत लेखी अर्ज सादर करावा. अन्यथा मुदतीनंतर कोणाचे काहीही आक्षेप नाहित असे गृहित धरून खरेदीखताच्या आधारे त्यांच्या नावाने सदर मालमत्तेची नोंद कर आकारणी नोंदवहित घेण्यात यईल याची नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, भोकर**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९७०१, ९८६०७२१३५६

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# अनाधिकृत होर्डींगवर मनपाची कारवाई

## ◆ विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** –शहरातील मध्यवर्ती भागात अशोकनगर झोन क्र.२ अंतर्गत महानगरपालिकेतर्फे अनाधिकृत जाहिरात होर्डींग्सवर धडक कारवाई केली. वसंतराव नाईक पुतळा ते अशोकनगर या रस्त्यावर हॉटेल तुलसी कम्फर्टच्या समोरील सेंटर पोल अर्थात मध्यवर्ती खांबावर अनाधिकृत बॅनर लावणारे वेदांत शैलेंद्र सबलोक, प्रतिमा शैलेंद्र सबलोक यांच्यासह बॅनर तयार करणारे व लावणारे रुपेश शेळके या व्यक्तीविरुध्द विमानतळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने मनपा हद्दीमध्ये जाहिरात फलक लावण्यासाठी एकूण १६७ ठिकाणं निश्चित केली आहेत. सदरील ठिकाणी जाहिरात फलकांच्या फ्रेम लावण्यात आलेल्या असून त्या फ्रेमची साईजसुध्दा निश्चित करण्यात आली आहे. ज्यामध्ये महानगरपालिकेने निर्धारित केलेले शुल्क भरून नागरिकांना /स्वयंसेवी संस्थांना तात्पुरती जाहिरात लावता येते. परंतु शहरात अशोक नगर परिक्षेत्रात वाणिज्य स्वरूपाची जाहिरात विनापरवानगी लावण्यात आल्याचे दि. २० जून २०२६ रोजी निदर्शनास आल्याने महाराष्ट्र विरुपन प्रतिबंधक कायदा १९९५ चे कलम ३ चे उल्लंघन केल्यामुळे संबंधित व्यक्ती विरुध्द विमानतळ पोलीस स्टेशन येथे महानगरपालिकेतर्फे फिर्याद क्र. ०२९०/२०२६ दि. २० जून २०२६ रोजी नोंदविण्यात आली आहे.

सदरील कारवाई पालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम व उपआयुक्त अजितपालसिंघ संधू यांच्या मार्गदर्शनाखाली अशोक नगर क्षेत्रिय कार्यालयाचे क्षेत्रिय अधिकारी राजेश जाधव, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सचिन गजभारे, उत्तर नांदेडचे अतिक्रमण पथक प्रमुख दत्ता कल्याणकर व त्यांच्या अतिक्रमण पथकाने पार पाडली आहे. महापालिकेने होर्डींग्ससाठी ऑनलाईन स्वरुपात परवानगीची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ४८ तासांच्या आत परवानगी मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सर्वांसाठी किमान ३ दिवसांची बॅनर, होर्डींग्स लावण्याची परवानगी असणार आहे. अतिशय अल्प दरात ही सुविधा उपलब्ध आहे. महानगरपालिकेने तात्पुरते जाहिरात फलकांना परवानगी देण्यासाठी शहरात एकूण १६७ ठिकाण निश्चित केले आहेत.





ऑनलाईन स्वरूपात अर्ज प्राप्त झाल्यानंतर क्षत्रिय अधिकारी त्यास परवानगी देतात. प्राप्त परवानगी पत्रावर शासन निर्णयानुसार क्यू. आर.कोड उपलब्ध करून दिला जातो. तो बॅनरच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य आहे. शहरातील नागरिकांनी व व्यापारी वर्गाने महापालिकेने निश्चित केलेल्या अधिकृत स्थळावर परवानगी घेऊन होर्डींग्स लावावेत, त्याचप्रमाणे अनाधिकृत जाहिरात फलक लावून शहर विद्रुपीकरण न करता महानगरपालिकेस सहकार्य करावे अन्यथा उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनाधिकृत होर्डिंग व बॅनर लावणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर भूमिका घेत अशाच प्रकारे गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा महानगरपालिका प्रशासनामार्फत देण्यात आला आहे.

# विष्णूनगर भागात घरफोडी; सोन्या-चांदीचा ऐवज लंपास

## वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भेट, डॉग स्कॉडलाही केले पाचारण

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या विष्णूनगर भागात राहणाऱ्या एका व्यापाऱ्याचे अज्ञात चोरट्यांनी घर फोडले. हे कुटुंब दर्शनासाठी तिरुपतीला गेले आहे. चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम असा लाखोंचा ऐवज लंपास केल्याचे सांगण्यात येत असले तरी गुन्हा दाखल झाल्यानंतरच घरफोडीत किती रक्कमेचा मुद्देमाल चोरीला गेला हे निष्पन्न होणार असल्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी सांगितले.

शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाट वस्ती असलेल्या विष्णूनगरमध्ये राहणारे इलेक्ट्रॉनिक्स उपकरणाचे व्यापारी चंद्रकांत दमकोंडवार हे दोन दिवसापूर्वी आपल्या कुटुंबियांसह घराला कुलूप लावून तिरुपती बालाजीचे दर्शन घेण्यासाठी गेले होते. अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप शनिवार, दि. २० जूनच्या पहाटे पावणेचारच्या सुमारास फोडले. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि ७० हजार रोख रक्कम असा लाखो रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे त्यांनी तिरुपती येथून फोनवरून पोलिसांना सांगितले. घटनास्थळाची पाहणी केली असता चोरटे त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले आहेत. घरफोडीची माहिती समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी शहर रामेश्वर व्यंजने, पोलीस निरीक्षक राजेश पुरी व त्यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर पोलिसांनी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना बोलावून घेतले. परंतु चंद्रकांत दमकोंडवार हे घरी नसल्याने घरफोडीमध्ये नेमका मुद्देमाल किती रक्कमेचा गेला हे ते परत आल्यानंतरच कळेल.

पोलीस विभागाच्या वतीने शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपण सहकुटुंब घराला कुलूप लावून बाहेरगावी जात असाल तर त्यांनी आपल्या फक्त शेजाऱ्यांना किंवा जवळच्यांनाच सांगावे. घरात किमती सामान किंवा मौल्यवान वस्तू असतील तर एखाद्या नातेवाईकास थांबण्यास बोलवावे. एवढेच नाही तर बाहेरगावी गेल्यानंतर तेथील फोटो सेशन केलेले फोटो सोशल माध्यमावर टाकू नये, जेणेकरून या फोटोंचा आधार चोरट्यांना मिळतो आणि त्यानंतर घरफोडी करण्यासाठी पुढे धजावतात. यासोबतच घरातून बाहेर पडत असताना घरातील एखादा लाईट आणि पंखा शक्यतो सुरू ठेवावा जेणेकरून चोरट्यांना घरात कोणीतरी आहे याचा भास होईल. सोशल माध्यमावर कोण कुठे जात आहे, किती दिवसासाठी गेले आहे याचा अभ्यास चोरी करणारे चोरटे करत असतात. या चोरट्यांना अशा प्रकारे संधी मिळू नये म्हणून आपण कुठेही गेलेले फोटो घरी आल्यानंतर सोशल माध्यमावर व्हायरल करावे, असे आवाहन डीवायएसपी रामेश्वर व्यंजने आणि पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी केले आहे.

# लेंडीचे पाणी कुंद्राळा धरणात लिफ्ट करण्याची मुखेड तालुका विकास समितीची मागणी



**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील बहुचर्चित लेंडी प्रकल्प पूर्ण होत असून, या प्रकल्पातील पाणी लिफ्ट करून कुंद्राळा धरणात टाकण्याची मागणी मुखेड तालुका विकास समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत केली आहे.

तालुक्यातील रावणगाव येथील लेंडी प्रकल्पाचे काम पूर्ण होत असून, यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवून वडिलोपार्जित जमिनी प्रकल्पाला दिल्या. त्यामुळे प्रकल्प मार्गी लागला आहे. या प्रकल्पात येणारे पाणी हे धरणाच्या वरच्या भागातील लोकांच्या हक्काचे असून, ते पाणी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून वापरण्याचा त्यांचा हक्कच आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या बॅकवॉटर क्षेत्रात असलेल्या कुंद्राळा मध्यम प्रकल्पात आणून टाकल्यास तालुक्यातील मोठ्या प्रमाणात शेती सिंचनाखाली येणार आहे. त्यासोबत तालुक्यातील अनेक गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार आहे.

सध्या कुंद्राळा धरणातील पाण्याचा वापर शेतीऐवजी पिण्याच्या पाण्यासाठी होत आहे. या धरणात तालुक्यातील १२ गावांतील जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठयाच्या विहिरी खोदण्यात आल्या आहेत. यामध्ये बारा ते पंधरा हजार लोकसंख्या असलेल्या गावासह मुखेड शहराचाही सामावेश आहे. त्यामुळे सिंचनासाठी बांधलेल्या या प्रकल्पातून केवळ लोकांची तहान भागवण्यासाठी पाण्याचा वापर केला जात असल्याने एकेकाळी या भागातील शेती व शेतकरी सुजलाम् सुफलाम् होता, मात्र सध्या शेतीसाठी पाणी मिळत नाही. त्यामुळे शेतकरी केवळ खरीप हंगामावर अवलंबून आहेत. त्यासाठी याच तालुक्यात पूर्णत्वास येत असलेल्या लेंडी प्रकल्पातील पाणी कुंद्राळा धरणात टाकल्यास शेतीसह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार असल्याचे मुखेड तालुका विकास समितीचे डॉ. श्रावण रॅपनवाड यांनी सांगितले. शनिवारी कुंद्राळा मध्यम प्रकल्पाच्या विश्रामगृह येथे डॉ. श्रावण रॅपनवाड हे पत्रकारांशी बोलत होते.

सदरील मागणी ही मागील पंधरा वर्षांपासून करण्यात येत असून, यासाठी तत्कालीन जलसंपदा मंत्री सुनिल तटकरे यांनी सदरील बाबीची दखल घेत काम करण्याचे अश्वासन दिले होते असेही यावेळी रॅपनवाड यांनी सांगितले.

यावेळी विकास समितीचे कार्याध्यक्ष अरुण महाजन, सामाजिक कार्येकर्ते धोंडीराम पाटील, हणमंत मामा वाडीकर, व्यंकट पाटील, प्रवीण काशेटवार, वैजनाथ गुट्टे, संभाजी पाटील, जाकीर शेख, सादक तांबोळी, संजय सोनकांबळे, बळवंत परमाळे, सुभाष गवते, दिगंबर फंताडे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तणूक करणाऱ्या ११ जणांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करून शांतता भंग करत मस्ती करणाऱ्या ११ जणांवर रस्ता सुरक्षा पथकाकडून कारवाई करण्यात आली. पथकाने ताब्यात घेतलेल्या ११ जणांना सुंदरीचा प्रसाद दिल्याचेही सांगण्यात येते. यावेळी एलसीबीचे पीएसआय नागनाथ तुकडे यांनी एक तलवार जप्त करून आरोपीला अटक केली.

ही कारवाई शहरातील विविध पोलीस ठाण्यांतर्गत करण्यात आली. शहरातील सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी नांदेड सिटी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अर्थात रस्ता सुरक्षा पथक स्थापन करण्यात आले आहे. या अंतर्गत पथक प्रमुख सपोनि एन. जी. पोमनाळकर व चार्ली पोलीस अंमलदार यांनी दि. १९ जून रोजी भाग्यनगर हद्दीतील छत्रपती चौक सम्राट चौक येथे ४ जण मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करीत असताना मिळून आले. नांदेड ग्रामीण हद्दीत पेट्रोलींग दरम्यान ढवळे कॉर्नर येथे मद्यप्राशन करून सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्यास पकडले.

इतवारा हद्दीतील जुना मोंढा येथे एका मद्यपीस पकडून कारवाई करण्यात आली. तर दामिनी पथकाने पेट्रोलिंग दरम्यान बर्की चौक सराफा बाजार येथे आरडाओरड करून



गोंधळ घालणाऱ्या ५ जणांना पकडून इतवारा पोलीस ठाण्यात कलम ११०/११७ म.पो का. प्रमाणे कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शहरात कोणीही सार्वजनिक ठिकाणी दारू पिऊ नये तसेच दारू पिण्यासाठी जागा उपलब्ध करून देऊ नये. तसेच सार्वजनिक शांततेचा भंग करू नये अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला आहे.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील देगाव कु. येथील एका २७ वर्षीय तरुण शेतकऱ्याने कर्जाच्या विवंचनेतून आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. काशिनाथ बालाजी कदम असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काशिनाथ कदम हे शेतीसाठी घेतलेले कर्ज कसे फेडावे या चिंतेत होते. घरात कोणीही नसताना त्यांनी राहत्या घरी गळफास घेतला. ही घटना नातेवाईकांच्या लक्षात आली असता मयताचे भाऊ रामकिशन कदम यांनी पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# स्वामित्त्व योजनेतून शाळांच्या मालमत्तेला मिळणार कायदेशीर कवच

## ◆ जिल्ह्यातील शंभर मुख्याध्यापकांची कार्यशाळा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील जिल्हा परिषद शाळांच्या मालमत्तेचे संरक्षण व कायदेशीर नोंदणी प्रक्रिया गतिमान करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद शाळांच्या जागेचे स्वामित्त्व प्रमाणपत्र मिळविण्याबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा जिल्हा परिषद नांदेडच्या कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात उत्साहात पार पडली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या संकल्पनेतून तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीपकुमार माळोदे यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यशाळेत जिल्ह्यातील पहिल्या टप्प्यातील शंभर शाळांच्या



मुख्याध्यापकांनी सहभाग घेतला. स्वामित्त्व योजनेअंतर्गत शाळांच्या मालमत्तेची मिळकत पत्रिका क्रमांक प्राप्त करण्याच्या प्रक्रियेविषयी यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेच्या प्रारंभी नांदेड तालुक्यातील चिखली येथील जिल्हा परिषद शाळेचे स्वामित्त्व प्रमाणपत्र प्रातिनिधिक स्वरूपात तयार करून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यामुळे शाळांच्या जागेची कायदेशीर नोंदणी करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळणार आहे. यावेळी शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी शाळांच्या मालमत्तेची नोंदणी व संरक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच भूमी अभिलेख विभागाचे खुडे, डाके आणि आशुतोष यांनी स्वामित्त्व प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व तांत्रिक बाबींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेस उपशिक्षणाधिकारी प्रज्ञा भवरे, लेखाधिकारी निळकंठ पाचंगे, सहायक प्रशासन अधिकारी राघवेंद्र मदनूरकर, समग्र बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता उबेद खान, जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी तसेच समग्र बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंते उपस्थित होते.

**वाङनिश्चय सोहळा**

**दमाम – बल्लेवार**

नांदेड येथील रहिवासी श्रीमती जयश्री व श्री संजीवकुमार दमाम यांचे सुपुत्र चि. अश्विन आणि श्रीमती देवी व स्व. विजय बल्लेवार यांची सुकन्या चि. सौ. कां. प्राची यांचा वाङनिश्चय सोहळा रविवार दि. २१ जून रोजी दुपारी १२.२१ वाजता नांदेड परिसरातील जुना कौठा येथील सप्तगिरी बँक्वेट हॉल येथे संपन्न होत आहे.

उभयतांस हार्दिक शुभेच्छा!

**–मुख्य संपादक**

# मनपा हद्दीतील प्रभाग क्र. १३ मधील रस्ता व नालीच्या कामाची चौकशी करा; आयुक्तांकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १३ मधील सावरीकर बिल्डिंग ते नवघाट ब्रिज दरम्यान करण्यात आलेल्या बी. टी. रोड व आर. सी.सी. ड्रेनेज कामात गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मोहम्मद इरफानउल्ला यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार वर्कऑर्डर क्र. १५९२१/२०२५ दिनांक २८ मार्च २०२५ अन्वये सावरीकर बिल्डिंग ते नावघाट ब्रिजपर्यंत बी.टी. रोड आणि आर.सी.सी. नाली बांधकामाचे काम मे. अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर यांना देण्यात आले होते. मात्र हे काम आजतागायत पूर्ण झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार ठेकेदाराने फक्त करबला कब्रस्तान येथील डी.पी. पर्यंतच काम केले असून, त्यापुढील संपूर्ण भाग अपूर्ण आहे. तसेच रस्त्यावर आवश्यक मुरूम, माती व सिमेंट न टाकता केवळ सुमारे ०.२५ इंच जाडीचा डांबरी थर टाकण्यात आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या नाल्यांवर फक्त आर.सी.सी. स्लॅब टाकण्यात आला असून, प्रत्यक्ष नालीचे काम करण्यात आले नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जानेवारी ते मार्चदरम्यान तयार करण्यात आलेल्या या रस्त्यावर मे महिन्यापासूनच खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे. अनेक ठिकाणी रस्ता उखडला आहे. तसेच नाल्यांमध्ये कचरा साचत असल्याने ड्रेनेज व्यवस्था पूर्णपणे निकामी ठरत असल्याचा आरोप आहे. यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय संबंधित ठेकेदाराने काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने काम पूर्ण झाल्याचा 'नो ड्यूज सर्टिफिकेट' घेतल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

# अभिनेते अरुण नलावडे यांच्याकडून पूजा चौधरी (धावड) यांच्या पाककलेचे कौतुक



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड जिल्ह्यातील हरनाळा (ता. बिलोली) येथील शिक्षक किशोरकुमार चौधरी यांची कन्या सौ. पूजा चौधरी (धावड) यांच्या महाराष्ट्रीयन पदार्थांची चव घेऊन ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे आणि उषा नाडकर्णी यांनी कौतुक केले आहे.

पुणे येथे बालगंधर्व रंगमंदिरात रुपये चित्रगाथा हा मराठी चित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्या महोत्सवात विविध स्टॉल लावण्यात आले होते. त्यात पूजा चौधरी यांनी महाराष्ट्रीयन फराळाचे खाद्य पदार्थ ठेवले होते. या मान्यवर अभिनेत्यांसह इतर रसिकांनीही या पदार्थांचे कौतुक केले आहे.

# नांदेड जिल्ह्यात दिव्यांगांसाठी ऑन द स्पॉट कृत्रिम अवयव वितरण शिबिराचे आयोजन

## २३ जूनपासून तालुकानिहाय दिव्यांग सहायक साधन वितरण मोहीम

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम हातपाय व इतर सहायक साधनांचा लाभ देण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाच्या सहायक आयुक्त कार्यालयामार्फत विशेष ऑन द स्पॉट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. एसआर ट्रस्ट (अधिकृत फॅब्रिकेटिंग एजन्सी ऑफ अलिम्को, रतलाम) यांच्या सहकार्याने २३ जून ते ८ जुलै या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये ही शिबिरे होणार आहेत.

शिबिरांमध्ये कृत्रिम पाय, कृत्रिम हात, कॅलिपर्स, एएफओ, स्मार्ट बूट तसेच इतर आवश्यक सहाय्यक साधनांचे मोजमाप घेऊन लाभार्थ्यांना साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांग व्यक्तींनी आधार कार्ड, रेशन कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र व यूडीआयडी कार्डसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

२३ जून रोजी मुदखेड येथे निवासी मूकबधिर विद्यालय मुदखेड, २४ जून रोजी पंचायत समिती, अर्धापूर, २५ जून रोजी साईबाबा निवासी अपंग विद्यालय तामसा रोड हदगाव, २६ जून रोजी जिनियस इंग्लिश पब्लिक स्कूल माहूर, २७ जून रोजी जिल्हा परिषद हायस्कूल किनवट, २८ जून रोजी हुतात्मा जयंतराव पाटील हायस्कूल हिमायतनगर, २९ जून रोजी पंचायत समिती भोकर, ३० जून रोजी सावित्रीबाई फुले निवासी मतिमंद विद्यालय उमरी, १ जुलै रोजी जिल्हा परिषद हायस्कूल धर्माबाद, २ जुलै रोजी पंचायत समिती बिलोली, ३ जुलै रोजी निवासी अंध विद्यालय देगलूर, ४ जुलै रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, नरसी (ता. नायगाव), ५ जुलै रोजी जिल्हा परिषद हायस्कूल मुखेड, ६ जुलै रोजी पंचायत समिती कंधार, ७ जुलै रोजी गटसाधन केंद्र, जिल्हा परिषद हायस्कूल, लोहा तसेच ८ जुलै रोजी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर नांदेड येथे शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. सर्व शिबिरे सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत चालणार आहेत.

जिल्ह्यातील गरजू दिव्यांगांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com